सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN 978-81-940842-0-4

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक १० • जानेवारी २०२६ • पृष्ठे ४४ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## सहकार भारती स्थापना दिनाच्या (११ जानेवारी) हार्दिक शुभेच्छा!

## सहकार चळवळीतील ४७ वर्षांची सहकार भारतीची यशस्वी वाटचाल!



## डॉ. उदय जोशी 'सहकार दीप' व विवेक जुगादे 'सहकार दूत' पुरस्काराने सन्मानित




राज्याच्या प्रस्तावित

## सहकार धोरणावर

चर्चासत्र, नागपूर



'शेड्यूल्ड' दर्जाबद्दल

## देवगिरी बँकेचा

विशेष सन्मान, ठाणे



दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर
31 वर्ष विश्वासाचे
आपला परिवार, आपली संस्था !
जनमानसाचा विश्वास... धरमपेठ महिला!
नूतन वर्ष अभिनंदन...
नव्या वर्षात जोडूया नाते विश्वासाचे,
उंचच उंच शिखर गाठूया समृद्धीचे.
सोन्यासारख्या लेकींसाठी हक्काचा आधार!
सोने कर्ज
Gold Loan
गोल्ड लोन 0.75%
• सुलभ प्रक्रिया
• त्वरित कर्जमंजुरी
• योजना सर्व शाखेत उपलब्द
आनंदी क्षणांचा सोबती...
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
। वाढदिवस । मुंज । साक्षगंध ।
सांस्कृतिक कार्यक्रम । कॉन्फरन्स
7888002023
तुमच्या सेवेत सदैव तत्पर !
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा
MOBILE BANKING
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
CORE BANKING
LIC /GIC पॉलिसी काढण्याची प्रीमियम भरण्याची व नुतनीकरणाची सुविधा
MSEDCL वीजबिल भरणा केंद्र
IRCTS आरक्षण सुविधा
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
मुख्य कार्यालय : प्लॉट नं ४२-अ, सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-४४००१०.
(0712)-2524336 / 2520303 info@dpmahila.com | Follow us on :
महाराष्ट्र | छत्तिसगढ | मध्यप्रदेश
www.dpmahila.com


राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र.नं. ८९१
२६ जानेवारी
प्रजासत्ताक दिनानिमित्त
सर्व देश वासियांना
मंगलमय शुभेच्छा..!
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
MOBILE बँकिंग
DEPOSITE सुविधा
LOAN सुविधा
CORE बँकिंग
NET बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना २५० कोटी रुपयाचे कर्ज वाटप.
६. ७५ कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरु करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
Transform stability into growth & possibility with
LOAN AGAINST PROPERTY
Instant Loan with lowest RoI*
No Charges on prepayment
Minimal Processing Fees*
* T&C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमचं नाव, तुमचं घर
टीजेएसबी
गृह कर्ज कायम
तुमच्यासोबत!
₹3 कोटींपर्यंत*
आकर्षक व्याजदर
*अटी लागू
www.tjsb.bank.in | : 022-48897210

# अनुक्रम


* सहकारी तत्वावरील भारत टॅक्सी सेवा नजीकच्या काळात सुरू होणार ........................०९
* सहकार भारती पुणे विभाग आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी.................................१०
* सुभाष हळर्णकर – गोव्यातील सहकाराचा चेहरा! ..........................................११
* नागरी सहकारी बँकांनी खातेदारांना अधिकाधिक सुविधा द्याव्यात – मराठे ..................१२
* नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक, भविष्याचा वेध घेणारे – सहकार मंत्री पाटील.........१३
* राज्याचे सहकार धोरण सक्षम बनवणार – परिषदेत धोरणात्मक निर्णय ......................१४
* शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त केल्याबद्दल देवगिरी बँकेचा सहकार भारतीकडून सन्मान ...१५
* आदर्श पतसंस्था एक हजार कोटी व्यवसायाचा टप्पा पार करणार – अध्यक्ष सुरेश पाटील..१६
* दि कल्याण जनता सहकारी बँकेस ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान ................१७
* दि यवतमाळ अर्बन बँकेला नुकतेच ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान...............१८
* कृषी पणनच्या विकासात पणन संस्थांचे योगदान.......................................१९
* सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी......................२१
* सांगली सहकार भारती आयोजित परिषदेत नवीन सहकार धोरणावर व्यापक चर्चा .....२२
* सांगली अर्बन बँकेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन ..........................................२३
* सहकार भारती कोल्हापूरच्या वतीने ४० सहकारी संस्थाचा सन्मान .....................२४
* ताणतणावाचे नियोजन करण्याची आवश्यकता – डॉ. दत्ता कोहीनकर .................२५
* विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेच्या वतीने संस्थांना आर्थिक निधी प्रदान........२६
* नागरी सहकारी बँका – प्रशासकीय 'व्यावसायिकता' आणि अस्तित्वाचा संघर्ष........२७
* मच्छिमारांसाठी व मासेमारीशी निगडीत शेती व्यवसाय करण्याकरिता 'नि:शुल्क समूह अपघात विमा योजना (GAIS)'.............................................................30
* 'सहकार स्वरूपा' – ॲड. दीपक पटवर्धन यांची यशस्वी कारकीर्द.....................३१
* 'सेवक' श्रेणीचे व्यावसायिक महत्त्व ....................................................३२
* रिझर्व्ह बँक रिपोर्ट : नागरी बँकांची २०२४-२५ची स्थिती.............................३३
* भारतभूमी सर्वांसाठी साक्षात राष्ट्रपुरुष – अंबरीश पुंडलिक ...........................३४
* सुवर्ण कर्ज ..........................................................................३५



'**सहकार सुगंध**' हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**जानेवारी २०२६ (वर्ष २१, अंक १०)**



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# सहकार भारती स्थापना दिनानिमित्ताने....!

सर्वप्रथम २०२६ नववर्षाच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा! सहकारी संस्थांची कामगिरी दिवसेंदिवस बहरत चालली आहे, अर्थकारणातील सहकाराचे स्थान बळकट होत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ ची शेवटची तिमाही आहे. याहीवर्षी सर्वच सहकारी संस्था अधिक चांगली कामगिरी करतील असा विश्वास वाटतो.

सहकार चळवळीच्या वृद्धी आणि शुद्धीसाठी सन १९७८ पासून कार्यरत असणाऱ्या सहकार भारतीचा स्थापना दिवस ११ जानेवारी रोजी असतो. गेल्या ४७ वर्षांत सहकार भारतीने मोठ्या प्रमाणावर सहकार चळवळीसाठी अथक प्रयत्न केले आहेत. आज देशभरात सर्वच राज्यांमध्ये सहकार भारतीचे काम सुरू आहे. सहकारी संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्याबरोबरच सुसंस्कारीत कार्यकर्त्यांचा समावेश व्हावा, हा देखील सहकार भारतीचा प्रयत्न राहिला आहे. महाराष्ट्रात सहकार भारतीने सर्वच क्षेत्रात मोठी आघाडी उभी केली आहे. सहकार भारतीच्या प्रयत्नांनी विविध फेडरेशन्स, असोसिएशन्समध्ये चांगले कार्यकर्ते निवडून आले आहेत. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये सहकार भारती आज अग्रणी आहे. आज देशभर सुमारे ६०० जिल्ह्यांमध्ये सहकार भारतीचे जाळे पसरले आहे. चांगले संस्कारक्षम कार्यकर्ते सहकारात आले पाहिजेत, सहकारी संस्था वाढल्या, फोफावल्या पाहिजेत यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

भारतात आज सुमारे ८ लाख ५० हजार सहकारी संस्था कार्यरत असून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद ३० कोटींच्या आसपास आहेत. महाराष्ट्रात सुमारे २ लाख २५ हजार सहकारी संस्था असून त्यांची एकत्रित सभासद संख्या सुमारे ६ कोटी एवढी आहे. विशेषत: ग्रामीण भागात सर्वाधिक लोक सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, जलसिंचन योजना, विकास सोसायट्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, ग्रामीण पतसंस्था, दूध संस्था तर शहरी भागात नागरी बँका आणि गृहनिर्माण सहकारी संस्था यांच्याशी थेट निगडित असून ते अशा सर्व सहकारी संस्थांचे लाभार्थी आहेत.

भारतातील सुमारे सव्वाशे वर्षांचा इतिहास असलेल्या सहकार चळवळीची ताकद लक्षात घेवूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आपल्या दुसऱ्या टर्ममध्ये जुलै २०२१ मध्ये सहकार क्षेत्रासाठी गृहमंत्री, सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वाखाली स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केले. दि. २४ जुलै २०२५ रोजी जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय सहकार धोरण (को-ऑपरेटीव्ह पॉलिसी) हे सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. सहकार क्षेत्राच्या पारदर्शकतेबरोबरच संपूर्ण डिजीटल प्लॅटफॉर्म तयार करण्याचा विचार या धोरणात करण्यात आला असून सहकारी संस्थांना एकत्रित डेटाबेसमध्ये आणून त्यांचे कामकाज सुलभ व विश्वासार्ह केले जाणार आहे. कृषी, दुग्ध, मत्स्य, प्रक्रिया उद्योग, विपणन, कर्ज पुरवठा आदी विविध सेवांचा एकत्रित लाभ देणाऱ्या बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्यावर भर दिला आहे. नवीन सहकार धोरणात 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यावर भर दिल्याचे दिसते.

केंद्र सरकारच्या सहकार धोरणाला अनुसरुन सर्व राज्यांनी देखील आपापल्या राज्यांचे धोरण डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करावयाचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकार धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समितीचे गठन केले आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या नेतृत्वाखाली या समितीमध्ये सहकार क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ व शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाय योजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कायद्यामध्ये काळानुरूप आवश्यक ते बदल करण्यासाठी सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यीय नवीन समिती गठीत करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी त्यांच्या गरजांनुसार वेगवेगळे आणि सुटसुटीत कायदे, नियम असावेत अशी जुनी मागणी आहे, ती यानिमित्ताने चर्चिली जाईल अशी अपेक्षा आहे.

आज सहकारी संस्थांवर सर्वांत मोठा आरोप हा व्यावसायिकता आणि पारदर्शकतेच्या अभावाचा आहे. नागरी सहकारी बँकांमध्ये, पतसंस्थांमध्ये खात्यांची माहिती अद्ययावत नसणे, सभासद, खातेदारांना योग्य डेटा न मिळणे, कर्जवाटप प्रक्रियेत प्रामाणिकपणाचा अभाव आणि भ्रष्टाचार या गोष्टींनी सहकाराची प्रतिमा काही प्रमाणात मलिन झाली आहे. नव्या सहकार धोरणात संपूर्ण संगणकीकरण, ऑनलाइन लेखापरीक्षण, पारदर्शक व्यवहार आणि डेटा-आधारित व्यवस्थापन यांना अग्रक्रम देण्याची गरज आहे. सभासदांचा सक्रिय सहभाग, पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि वित्तीय शिस्त याला महत्त्व देणारे धोरण असावे. निवडणुकांत पारदर्शकता, संचालक मंडळासाठी उत्तरदायित्त्वाची तरतूद आणि कायदेशीर सुधारणा हे मुद्दे देखील विशेषत्वाने असायला हवेत.

नागरी सहकारी बँकांकरिता आणि पतसंस्थांसाठी सहकार भारतीच्या वतीने सहकार सुगंधकडून दरवर्षी दैनंदिनी प्रसिद्ध करण्यात येते. नागरी सहकारी बँकांना उपयुक्त असलेल्या विषयांचा यामध्ये समावेश केलेला असतो. नागरी बँकांच्या अनेक प्रमुखांनी अशी मागणी केली होती की, रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकांचा अर्थ लावणे मोठे जिकीरीचे असते. यासाठी मराठीतून सोप्या पद्धतीने महत्त्वाच्या सर्व परिपत्रकांच्या संदर्भ क्रमांकासह मराठीतून संक्षिप्तपणे गोषवारा दिलेला आहे. त्याचबरोबर सदरची सर्व मूळ इंग्रजी भाषेतील परिपत्रके वाचण्यासाठी देखील क्यू-आर कोडचा वापर करुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. पतसंस्थांसाठी स्वतंत्रपणे दैनंदिनी प्रसिद्ध करण्यात येत आहे. पतसंस्थांशी संबंधित विविध विषयांवर यामध्ये लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. आपण सर्वांनी याचा जरुर लाभ घ्यावा, असे आवाहन आहे.



संपादकीय...

सहकार भारती स्थापना दिनाच्या (११ जानेवारी) निमित्ताने सर्व सहकारातील कार्यकर्त्यांना हार्दिक शुभेच्छा!
जय सहकार!

# सहकारी तत्वावरील भारत टॅक्सी सेवा नजीकच्या काळात सुरू होणार

**चंदीगड** – सहकारी तत्वावरील भारत टॅक्सी सेवा नजीकच्या काळात सुरू करण्यात येणार असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी हरियाणा येथील सहकार संमेलनात बोलताना सांगितले.

ते म्हणाले, भारत टॅक्सीच्या माध्यमातून खासगी कंपन्यांच्या वर्चस्वाला आव्हान देणे आणि टॅक्सी चालकांचे उत्पन्न दुप्पट करणे हे भारत टॅक्सी सेवा सुरू करण्यामागचे उद्दीष्ट आहे. सध्या ज्या कंपन्या या क्षेत्रात काम करतात त्यामध्ये नफा हा मालकांकडे जातो मात्र या नवीन सेवेच्या माध्यमातून सर्व रक्कम चालकांना मिळणार आहे. आणि प्रवास भाड्याची सर्व रक्कम ही चालकाकडे असणार आहे. या नवीन प्रयोगाच्या माध्यमातून वाहन चालकांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न असणार आहे. याचा फायदा प्रवासी वर्गाला होणार आहे. मुख्य म्हणजे विमा संरक्षण रक्कम वाहन चालकांना मिळणार आहे.

ही नवीन सेवा सध्या दिल्ली आणि राजकोट येथे प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. नजीकच्या काळात लवकरच देशात सुरू करण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षात देशातील सर्वात मोठी टॅक्सी सेवा म्हणून नावारूपाला येईल असे त्यांनी सांगितले.



**केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह**

# देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी सेवा संस्थांची निर्मिती
## केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती

**नवी दिल्ली** – देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी सेवा संस्था, तसेच सहकार क्षेत्राला ११ वर्षांत ४ लाख २१ हजार कोटी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत बोलतांना सांगितली.

देशातील सहकाराचे जाळे अधिक मजबूत व्हावे, सहकार क्षेत्राचा समप्रमाणात विकास व्हावा, यासाठी सहकार मंत्री अमित शाह यांनी २०२९ पर्यंत देशात नव्या दोन लाख बहुउद्देशीय विविध कार्यकारी सहकारी संस्थांची (एम पॅक्स) स्थापना करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत ३२ हजार एम पॅक्सची स्थापना करण्यात आली आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर देशातील प्रत्येक पंचायतीत किमान एक सहकारी सेवा संस्था असेल, असे त्यांनी सांगितले. ६० वर्षांहून अधिक काळ सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसने सहकारावर फक्त राजकारण केले. मोदी सरकारने सहकाराला खऱ्या अर्थाने गती आणि बळकटी दिली, असेही मोहोळ म्हणाले.



*** देशातील सहकारिता क्षेत्राचा समतोल विकास झाला नाही–**

काँग्रेसच्या सत्ताकाळात देशातील सहकारिता क्षेत्राचा समतोल विकास झाला नाही. पश्चिमेकडील काही राज्यांत सहकार चळवळीचा विस्तार झाला. मात्र पूर्वेकडील राज्ये यात मागे राहिली. देशात सुमारे आठ लाख सहकारी संस्था आणि जवळपास ३० कोटी सभासद कार्यरत असतानाही, काँग्रेसच्या काळात सहकारिता क्षेत्राचा कारभार कृषी मंत्रालयांतर्गत केवळ संयुक्त सचिव स्तरावरच पाहिला जात होता. सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर अवघ्या तीनच वर्षांत अमित शाह यांनी आमूलाग्र बदल घडवत ११४ हून अधिक महत्त्वपूर्ण निर्णय घेत सहकार क्षेत्राला बळकटी दिली. यासंदर्भात केलेले आदर्श उपविधींना (मॉडेल बाय लॉज) केरळ वगळता देशातील ३२ राज्यांनी मान्यता दिली आहे,

*** विविध सहकारी सोसायट्यांच्या संगणकीकरणावर भर –**

देशात संगणक आणण्याचे श्रेय काँग्रेस घेते. मात्र, त्यांच्या कार्यकाळात 'पॅक्स'चे संगणकीकरण करून त्यांची कार्यक्षमता विस्तारण्याचा विचार कधीच झाला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतत्वातील सरकारने देशातील ७९ हजार 'पॅक्स'चे संगणकीकरण सुरू केले असून त्यासाठी २९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी 'पॅक्स'द्वारे केवळ अल्पमुदतीचे पीक कर्ज आणि कृषी संबंधित पुरवठा एवढेच काम केले जात होते. सरकारने आदर्श उपविधी (मॉडेल बाय लॉज) तयार करून पॅक्सना बहुद्देशीय स्वरूप दिले असून त्यामुळे सहकारी सेवा संस्थांना विविध प्रकारचे २५ व्यवसाय करता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राला वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. मोदी सरकारने पॅक्सच्या संगणकीकरणाला प्राधान्य दिल्याने हे शक्य झाले आहे. संगणकीकरणामुळे पॅक्सच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. परिणामी, ग्रामीण स्तरावर शेतकऱ्यांना विविध सेवा अधिक वेगाने, पारदर्शकपणे आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होत आहेत. याचा थेट फायदा ग्रामीण अर्थव्यवस्थेला होत असून ग्रामीण अर्थव्यवस्था गतीने विकसित होत आहे.

*** सहकारी संस्थांना आर्थिक मदत –**

सन १९६३ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सहकार विकास महामंडळामार्फत २०१४ पर्यंत म्हणजे ५० वर्षांत प्रामुख्याने काँग्रेसच्या सत्ताकाळात देशभरातील सहकारी **पुढील पानावर...**




# सहकार भारती पुणे विभाग आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी

**कारवार** – सहकार भारती पुणे विभागाच्या वतीने सहकारी बँक संचालक, व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग येथे आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी गिरीश भवाळकर यांनी प्रास्ताविकात प्रशिक्षण वर्ग आयोजनामागची भूमिका मांडली. बुलढाणा मल्टिस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी समूह वित्त योजना, मुख्य बँक आणि सहयोगी बँकांच्या भूमिका व जबाबदारी यावर विवेचन केले. ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल यांनी सहकारी बँकांसमोरील आव्हाने यावर तर सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी मॅनेजमेंट गेम्स यांवर मनोरंजनयुक्त सत्र घेतले. सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे यांनी नवीन धोरणाची आवश्यकता यावर विवेचन केले.

## प्राथमिक विविध कार्यकारी सोसायटीचे संगणकीकरणावर भर

**मुंबई** – राज्यातील प्राथमिक विविध कार्यकारी सोसायटीचे संगणकीकरण यावर विशेष भर देण्यात येत असून आज अखेर एकूण १२ हजार सोसायटीचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. राज्यात एकूण २१ हजार विविध कार्यकारी सोसायटी आहेत.

या प्रक्रियेसाठी गो लाईव्ह ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ग्रामीण भागात सहकार आणि अर्थ पुरवठा सक्षम करण्यासाठी प्राथमिक सेवा सोसायटी संगणकीकरण यावर विशेष भर केंद्र सरकारच्या वतीने देण्यात येत आहे.

## अंधेरी पूर्व परिसरातील उपनिबंधक कार्यालयाचे स्थलांतर

**मुंबई** – अंधेरी पूर्व परिसरातील उपनिबंधक कार्यालय वडाळा येथे होते. ते नवीन जागेत स्थलांतरीत करण्यात आले. सहकारी पतसंस्था पदाधिकारी तसेच सहकार भारती मुंबई विभागाचे अध्यक्ष राहुल पाटील वायव्य मुंबई जिल्हा अध्यक्ष आणि दत्त दिगंबर पतसंस्था अध्यक्ष तानाजी गुजर, जोगेश्वरी नागरिक सहकारी पतसंस्थेचे सचिव वासुदेव भंडारकर, शंकर पिल्ले, संकल्प सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सदस्य केशव काजरेकर, प्रभाकर पाटील, कोकण विकास सहकारी पतसंस्थेचे रामचंद्र बोभाटे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

मागील पानावरून...

## देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी...

संस्थांना केवळ ४५ हजार कोटी रुपयांची मदत करण्यात आली. पंतप्रधान मोदी पंतप्रधान झाल्यानंतरच्या ११ वर्षांत सरकारने ही मदत मागील ५० वर्षांच्या तुलनेत दहा पट वाढवून चार लाख २१ हजार कोटी रुपयांपर्यंत नेली आहे. त्यावरून केंद्र सरकार सहकाराला किती प्राधान्य देते, हे आपोआपच स्पष्ट होते.

*** धान्य साठवण योजनेला गती –**

देशातील शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांच्या जोरावर भारत जागतिक स्तरावर कृषी उत्पादनात तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र, देशातील एकूण धान्य उत्पादनाच्या तुलनेत साठवणूक (स्टोअरेज) क्षमतेत सुमारे १६६ दशलक्ष मेट्रिक टनांची कमतरता आहे. या अपुऱ्या साठवणूक क्षमतेमुळे मोठ्या प्रमाणावर धान्याची नासाडी होते. तसेच, धान्य साठवण व वाहतुकीसाठी लागणाऱ्या अंतरात वाढ झाल्याने वाहतूक खर्चही वाढतो. या पार्श्वभूमीवर, देशातील शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि कृषी उत्पादन व्यवस्थेचा कणा अधिक मजबूत करण्यासाठी धान्य साठवणुकीसाठी जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवण योजनेवर मंत्रालयाने काम सुरू केले आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर धान्याची नासाडी कमी होईल, वाहतूक खर्चात बचत होईल आणि शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळेल.

*** ११ राज्यात ११ गोदामांची उभारणी पूर्ण –**

सरकार शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याने शेतकऱ्यांना धान्य साठवणीसाठी दूरवरच्या गोदामांकडे जावे लागू नये. उलट शेतांजवळच गोदामे उभारली जावीत. याच उद्देशाने देशभरात पॅक्सच्या माध्यमातून विकेंद्रित पद्धतीने स्थानिक पुरवठा व मागणी लक्षात घेऊन गोदामांच्या उभारणीचे काम सुरू आहे. या उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या पायलट प्रकल्पामध्ये आतापर्यंत ११ राज्यांतील ११ गोदामांची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. पायलट प्रकल्पाचा विस्तार करत आता ७०४ पॅक्सची निवड केली असून, यामुळे सुमारे ६० हजार मेट्रिक टन साठवण क्षमतेची निर्मिती होणार आहे. ही गोदामे भाडेतत्त्वावर उपलब्ध व्हावीत, यासाठी नाफेड, एफसीआय, एनसीसीएफ आदी संस्थांशी करार करण्यात आले आहेत. त्यामुळे पॅक्सना धान्य साठवणुकीसाठी खात्रीलायक सुविधा उपलब्ध होणार आहे.

# सुभाष हळर्णकर - गोव्यातील सहकाराचा चेहरा!

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांसह परिवारातील विविध संस्थांशी निगडीत असणारे आणि सेवाकार्यात तन-मन-धनाने सदैव सहभागी होणारे सेवाव्रती सुभाष साजू हळर्णकर यांचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख...**

स्थान आणि वर्ष आठवत नाही. सहकार भारतीची बैठक. बैठकीच्या प्रारंभी, कार्यकर्त्यांचा परिचय सुरू होता. जवळ-जवळ ६ फूट उंची, दणकट बांधा, कपाळावर डाव्या बाजूला मुद्दाम पुढे ओढलेत असे वाटायला लावणारे, पण व्यवस्थित चापून-चोपून बसवलेले चंदेरी रंगाकडे झुकणारे केस, डोळ्यावर चष्मा घातलेला कार्यकर्ता परिचय द्यायला उभा राहिला.

सुभाष साजू हळर्णकर असे नाव सांगताना, ण व त्यावरचा रफार जोर देऊन उच्चारल्यामुळे, त्याचे नाव सर्वांच्या कायम लक्षात रहावे व ते नीट म्हटले जावे अशी त्याची अपेक्षा असल्याचे स्वाभाविकपणे जाणवून देण्याची पद्धत मनाला भावली. सहकार भारतीच्या कामाचा गोव्यातही प्रारंभ व्हावा म्हणून, सुभाष महाराष्ट्र प्रांताच्या बैठकांना उपस्थित राहू लागला. आपल्या मोकळ्या-ढाकळ्या स्वभावाने, कोंकणी धाटणीच्या बोलीने व गोव्याच्या पद्धतीने कोणालाही एकेरी नावाने हाक मारल्याने अनेक कार्यकर्त्यांशी सहज संवाद, जवळीक साधली गेली.




सहकार भारतीच्या संघटनात्मक कामाची गोव्यात सुरुवात व्हावी, चालना मिळावी म्हणून सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक गोव्यात योजण्याचे निश्चित केले. सहकार भारतीची स्वतःची संघटनात्मक रचना नसताना, बैठक यशस्वी होण्यासाठी, सुभाषने आपल्या संपर्क यंत्रणेतून सर्व व्यवस्था उभ्या केल्या. इतकेच नव्हे तर, सहकार भारतीच्या कामाची गोव्यातील कार्यकर्त्यांना माहिती व्हावी यासाठी, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, राजकीय कार्यकर्ते, संघ परिवारातील संस्थांचे कार्यकर्ते यांच्या मेळाव्याचे आयोजन बैठकीला जोडून केले. त्यामुळे सहकार भारतीच्या गोवा कार्यकारीणीची मुहुर्तमेढ रोवली गेली. यथावकाश, गोवा क्रांतिदिनाच्या सुमुहुर्तावर १८ जून, १९९५ रोजी सहकार भारती, गोवा प्रदेश कार्यकारिणीची विधीवत स्थापना करण्यात आली. स्वाभाविकच सुभाष हळर्णकर यांच्याकडे गोवा प्रदेशाचे पहिले सरचिटणीस म्हणून जबाबदारी देण्यात आली. कार्यकर्त्यांशी सतत संपर्क, कार्यकर्त्यांचे अभ्यासवर्ग, चर्चासत्र, कार्यशाळा, प्रवास यामुळे अवघ्या चार वर्षांत म्हणजेच, ७ फेब्रुवारी, १९९९ रोजी गोवा राज्याचे सहकार भारतीचे पहिले अधिवेशन, बागायतदार भवन, फोंडा येथे यशस्वीपणे संपन्न झाले. विविध विषयांवर चर्चा व गोव्यातील सहकार चळवळीच्या सुदृढीकरणासाठी केलेल्या १४ कलमी मागण्या हे या अधिवेशनाचे वैशिष्ट्य ठरले.

१९७२ पासून सुभाष गोवा राज्याच्या सहकार विभागात कार्यरत होता. सहकार विभागातील या कामाचा अनुभव सहकार भारतीच्या कार्यवाढीसाठी तसेच सहकारी संस्थांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी निश्चितच झाला. २००२ साली त्याने स्वेच्छानिवृत्ती घेतली. गोवा राज्याच्या सहकार मंत्र्यांचा निजी सचिव म्हणूनही काही वर्षे त्याने काम केले. अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीत त्याचा मोलाचा सहभाग राहिला. स्वेच्छानिवृत्ती घेतल्यामुळे, त्याला सहकार भारतीच्या संघटनात्मक कामात अधिक वेळ देता आला. म्हणूनच गोवा राज्याच्या सीमेलगत असलेल्या सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या संघटनात्मक कामाची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली. सहकार भारतीचे कार्यकर्ते प्रवासाला आले की, गोव्यातील कोणत्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची भेट घालून द्यायची, याची योजना सुभाषनेच करावी. मग संघटन प्रमुख तात्याराव इनामदार आले की, संघटनात्मक दृष्टीने योग्य कार्यकर्त्यांच्या भेटी व सरचिटणीस सतीश मराठे, विष्णू बोबडे आले की, सहकारी बँका, पतसंस्थांच्या संचालक / मुख्याधिकाऱ्यांच्या तसेच अगदी मा. मुख्यमंत्री, सहकार मंत्र्यांच्या भेटीची योजना केली जात असे. अगदी सहकार सुगंधचे वर्गणीदार वाढावेत यासाठी उदय पेंडसे यांच्या प्रवासाची योजनाही सुभाषने केली होती.

सुभाषने फक्त सहकार भारतीच नव्हे, तर संघ, जनसंघ, सामाजिक समरसता मंच, विवेक साप्ताहिक, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भाजप या परिवारातील अन्य संस्थांच्या कामांची जबाबदारीही कालपरत्वे निभावली आहे. म्हणून सुभाष म्हणजे गोव्यातील संघपरिवाराचा चेहरा असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वैद्यकीय अधिकारी असलेला डॉक्टर निशांक हा मुलगा, वीजनिर्मिती विभागात अधिकारी असलेली सुमेधा ही मोठी मुलगी, शिक्षिकेचं व्रत सांभाळणारी मैथिली ही लहान मुलगी, माहिती-तंत्रज्ञान विभागात अभियंता म्हणून कार्यरत असलेली निमिषा ही स्नुषा, टीसीएसमध्ये कार्यरत व्यवस्थापक असलेले मोठे जावई दिलीप व कोकण रेल्वेत मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असलेले धाकटे जावई दीपक असा सुविद्य परिवार सुभाषजींना लाभला आहे. सुभाषजींच्या धर्मपत्नी सुप्रियाताईंनी घरची आघाडी संभाळत सुभाषजींनीच स्थापन केलेल्या समर्थ शिशु मंदिरात अध्यापनाचे काम केले आहे. संघ संस्करात वाढलेल्या आणि ते संस्कार अन्य कार्यकर्त्यात संक्रमित होण्यासाठी सतत क्रियाशील असलेल्या सुभाषला अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा! त्याचे उर्वरीत आयुष्य ही आरोग्यदायी, आनंदी, सुख-समृद्धीचे जावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना! जय सहकार...!!

**- सतीश मराठे**
**आरबीआय, नाबार्ड संचालक**
**- उदय पेंडसे**

*****

# नागरी सहकारी बँकांनी खातेदारांना अधिकाधिक सुविधा द्याव्यात - मराठे



**सांगली –** गेल्या काही वर्षांमध्ये सहकार क्षेत्राने मोठी भरारी घेतली असून देशातील बँकिंग सेक्टरची वाटचाल उत्तम रीतीने सुरू आहे. सध्याचा बँकिंग कायदा सक्षम आहे, असे मत आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केले.

सांगली अर्बन बँकेतर्फे बँकेचे संस्थापक कै.म.ह.तथा अण्णा गोडबोले स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. रिझर्व बँकेचे संचालक मराठे यांचे व्हिजन डॉक्युमेंट २०२५ ते २०३० या विषयवार व्याख्यान झाले. सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील विविध सहकारी बँकाचे अध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नागरी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे, कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, राजारामबापू सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष प्रा. श्यामराव पाटील बँकेचे अध्यक्ष सी. ए. श्रीपाद खिरे, माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक उपस्थित होते.

प्रारंभी स्व. अण्णा गोडबोले यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. अध्यक्ष खिरे यांनी प्रास्ताविक केले. मराठे यांचा परिचय संचालक संजय धामणगावकर यांनी करून दिला. मराठे यांनी सहकारी बँकिंग क्षेत्रातील सद्यस्थिती आणि रिझर्व बँकेची ध्येयधोरणे, नवीन सुधारित सरक्यूलर, नेटवर्थ, बिझनेस ग्रोथ या विषयांवर मार्गदर्शन केले.

**※ खातेदारांना जास्तीत जास्त सुविधा दिल्या पाहिजेत. –**

काँग्रेसच्या काळात सहकार क्षेत्राकडे राजकीय दृष्टीने पाहिले जात होते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये सहकार क्षेत्राने मोठी भरारी घेतली आहे. देशातील बँकिंग सेक्टरची वाटचाल उत्तम रीतीने सुरू आहे. सध्याचा बँकिंग कायदा सक्षम आहे. नागरी सहकारी बँकांनी खातेदारांना जास्तीत जास्त सुविधा दिल्या पाहिजेत. डिजिटल बँकिंग सुविधा देणे यावर भर दिला पाहिजे. रिझर्व बँकेने नुकतीच अनेक वर्ष जुनी असणारी बँकिंग सर्क्युलर रद्द करून नवीन २७ मास्टर सर्क्युलर लागू केली आहेत. त्यानुसार सर्व बँकांनी कामकाज करावे असे सांगितले.

**※ केवळ शाखा विस्तार पुरेसा नाही –**

व्हिजन डॉक्युमेंट म्हणजे आपली बँक आत्ता कुठे आहे आणि पुढील ५ वर्षांत कुठे न्यायची आहे, हे ठरवणे. सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्ससाठी प्रयत्नशील राहणे. व्हिजन डॉक्युमेंटमधील १० प्रमुख मुद्दे आहेत, त्याप्रमाणे बँकांनी काम करावे असे आवाहन मराठे यांनी केले. केवळ शाखा विस्तार झाला म्हणजे बँकेची वाढ झाली असे नाही. शाखा विस्तार हा त्यातील एक भाग आहे. मार्च २५ चा सहकारी बँकिंग क्षेत्राचा ग्रोथ रेट हा फक्त ५ टक्के आहे. तो अजून वाढणे आवश्यक आहे. देशात साडेसात कोटी एस.एम.ई. आहेत. त्यातील ५० टक्के ग्रामीण भागातील आहेत. त्यामुळे नागरी सहकारी बँकानी (एस. एम. ई) लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रांना अर्थसहाय्यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच गृह कर्जेही वाढवली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

बँकेचे संचालक अनंत मानवी, एच. वाय. पाटील, सागर फडके, रवींद्र भाकरे, स्वाती करंदीकर, अश्विनी आठवले, रणजीत चव्हाण उपस्थित होते.

---

# सांगली अर्बन बँक अध्यक्षपदी सी. ए. श्रीपाद खिरे व उपाध्यक्षपदी संजय पाटील



**सांगली –** सांगली अर्बन को–ऑप. बँकेच्या अध्यक्षपदी सी. ए. श्रीपाद खिरे तर उपाध्यक्षपदी संजय पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. रिझर्व बँकेच्या सक्सेशन प्लॅनिंग या धोरणास अनुसरून व अन्य संचालकांना संधी मिळावी, या हेतूने अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी नुकताच राजीनामा दिला होता. यापुढेही गाडगीळ हे संचालक मंडळात ज्येष्ठ संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहणार आहेत.

बँकेच्या प्रधान कार्यालयात अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चेतन जावीर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. अध्यक्षपदी निवड झालेले सी. ए. खिरे हे यापूर्वी उपाध्यक्ष होते. याआधीच्या संचालक मंडळात ७ वर्षे तज्ज्ञ स्वीकृत संचालक म्हणून त्यांनी काम केलेले आहे. बँकेच्या व्यवस्थापन मंडळ (BOM) चे सध्या ते अध्यक्ष होते. अनेक सहकारी बँका व संस्थांकडे ते ऑडिटर व सल्लागार म्हणून काम करत आहेत.

उपाध्यक्ष पाटील हे गेली १० वर्षे संचालक म्हणून कार्यरत आहेत. व्यवसायाने अभियंता आहेत. निवडीनंतर नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे संचालक मंडळ, कमर्चारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

# नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक, भविष्याचा वेध घेणारे - सहकार मंत्री पाटील

**पुणे –** महाराष्ट्रासाठी तयार करण्यात येणारे नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक आणि भविष्याचा वेध घेणारे असणार आहे, असे मत राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन आणि कॉसमॉस सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन' यावर राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.



**⁕ विभागनिहाय बैठकांचे आयोजन –**

ते म्हणाले, सहकार मंत्रालयाकडून विभागनिहाय बैठकांचे आयोजन करण्यात येत असून त्या त्या भागातील सहकार क्षेत्रातील तज्ञ, अधिकारी, संस्थांचे अनुभव आणि सूचना घेण्यात येत आहेत. या सगळ्या मतांचा विचार करून धोरण व्यापक स्वरूपात तयार केले जाणार आहे. परिषदेत सहकार क्षेत्रातील विविध घटक संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी संचालक सहभागी झाले होते. परिषदेत सायबर सुरक्षा, एआय, तसेच सहकार क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सुरक्षित डिजिटल व्यवहार यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले. राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते करण्यात आले. राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आणि लेखक गौतम कोतवाल उपस्थित होते.

**⁕ आधुनिक तंत्रज्ञानावर भर हवा –**

समारोप सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. ते म्हणाले, नवीन सहकारी धोरण ठरविताना अन्य राज्यातील चांगल्या पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. सहकारी संस्थांनी तरुण आणि महिलांचा सक्रिय सहभाग वाढविला पाहिजे. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारून अधिक सक्षम होण्याची गरज आहे. यावेळी त्यांच्या हस्ते सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितले की, सहकाराच्या माध्यमातून समृद्धी हवी असेल तर त्यासाठी सहकाराच्या विचाराची पाळेमुळे समाजात रुजण्याची गरज आहे. समाज प्रगती पथावर नेण्यासाठी सहकार हा उत्तम मार्ग आहे. बँकेने सर्वसमावेशक धोरण स्वीकारून व्यावसायिक दृष्टीकोनातून यशस्वी वाटचाल केली आहे. कोतवाल यांनी मनोगत व्यक्त केले.

# सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचा १० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**सोलापूर –** सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचा १० वा वर्धापन दिन येथे नुकताच उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते पतसंस्थांचे पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.



फेडरेशनच्या स्थापनेपासूनच्या दहा वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेण्यात आला. मागील एका दशकात पतसंस्थांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांच्या अडचणी सोडवणे आणि सहकार तत्त्वे रुजवून त्यांना आर्थिक शिस्त लावण्यात फेडरेशनने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे म्हणाले की, पतसंस्थांनी सभासदांचा विश्वास कायम ठेवत, कर्जवाटपात पारदर्शकता आणि व्यवहारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांच्या आर्थिक विकासाला चालना देण्याचे आवाहन त्यांनी केले. पुढील काळात पतसंस्थांच्या बळकटीकरणासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

फेडरेशनचे उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, संचालक आप्पाराव इटेकर, व्यवस्थापक मीनाक्षी केंची, जनसंपर्क अधिकारी सुहास शिंदे, नागेश माने, ओंकार पतंगे, एसआरओ नितीन एकबोटे, अनिल कन्ना, केदार लोंढे, साध्वी म्हेत्रस्कर, संस्कार नरोटे, चंद्रकांत येमगर, संदीप गायकवाड, समर्थ नावडे, योगेश हेळकर, आदित्य खांडेकर, मंदार मेंढापुरे यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यातील पतसंस्थांसाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती

**पुणे –** राज्यातील नागरी सहकारी बिगर कृषी सहकारी पतसंस्था यांच्यासाठी सहकार विभागाने स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. यामुळे राज्यातील सुमारे २० हजार पतसंस्थांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकणार आहे.

राज्यात सध्या सुमारे १३ हजार ४१२ नागरी आणि ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्था आणि सुमारे ६ हजार ४३६ पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था अशा एकूण १९ हजार ९४८ पतसंस्था कार्यरत आहेत. मात्र या सर्व सहकारी संस्थांची माहिती सहकार खात्याकडे उपलब्ध नाही. म्हणूनच ही माहिती एकत्रितरीत्या उपलब्ध व्हावी, यासाठी ऑनलाईन एमआयएस प्रणाली नव्याने सुरू करण्यात आली आहे. तसेच या पोर्टलच्या माध्यमातून पतसंस्थांमधील आर्थिक माहिती उपलब्ध होणार आहे.

# राज्याचे सहकार धोरण सक्षम बनवणार - परिषदेत धोरणात्मक निर्णय



**नागपूर** - केंद्र सरकारच्या नवीन सहकार धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्याचे सुद्धा नवे सक्षम सहकार धोरण तयार करणार असल्याचे ठरविण्यात आले. राज्याचे नवे सहकार धोरण ठरविण्यासंदर्भात येथे विशेष संवाद कार्यक्रम व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

चर्चासत्राला राज्य सहकारी बँकेचे प्रशासक व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विद्याधर अनास्कर, सहकार खात्याचे अप्पर निबंधक व महाराष्ट्र शासनाचे सहसचिव संतोष पाटील सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांनी मार्गदर्शन केले.

दि धरमपेठ महिला मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्ष निलिमा बावणे, नागपूर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र घाटे, सहकार भारती नागपूर विभाग प्रमुख संजय कुमार रोकडे उपस्थित होते. सहकार क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तींसह सहकारी संस्थांचे पदाधिकारी व संचालक यांनी चर्चासत्रात सहभागी होऊन अनेक सूचना मांडल्या. संचालन सहकार भारती नागपूर महानगर महामंत्री किरण रोकडे व संघटन प्रमुख राहुल कोडमलवार यांनी केले. कार्यक्रमाला सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अनेक सहकारी संस्थांचे पदाधिकारी व संचालक उपस्थित होते.

---

# दि यवतमाळ अर्बन बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**यवतमाळ** - नूतन वर्षासाठी दि यवतमाळ अर्बन बँकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन रा. स्व. संघाचे नगर संघचालक धनंजय पांचघरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

पंचपरिवर्तन हा दिनदर्शिकेचा विषय आहे. प्रत्येक पानावर नागरिक कर्तव्य, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण आणि 'स्व'चा बोध विषयावरील चित्रे आणि माहिती देण्यात आली. बँक अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे, संचालक, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

---

# भाग्यश्री सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



चंद्रपूर - विश्वास हा सर्वश्रेष्ठ नाते आहे, आरोग्य सर्वश्रेष्ठ देणगी आहे, समाधान सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे, निर्मोही जगणे यातच जीवनाची फलश्रुती आहे. विश्वास जपत मार्गक्रमण करीत राहणारी माणसे वा संस्था या समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणतात. विश्वास हे सर्वश्रेष्ठ नाते जपणे यातच समाजाचा सर्वांगीण विकास आहे, असे नंदा बुद्ध विहार येथील भदंत करुणाबोधी महाथेरो यांनी सांगितले.

भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था आयोजित दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. मंचावर भदंत करुणाबोधी महाथेरो, भिख्खू मैत्रिबोधी भिक्खुणी संघमित्रा यांचेसह संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, सह सरव्यवस्थापक दत्ता बहादुरे होते.

पतसंस्थेची ३३ वर्षांची वाटचाल विश्वासाचे मूर्तीमंत कौतुकास्पद आदर्श असून विवेक जागा ठेवून चाललेला हा गौरवशाली प्रवास अखंड समृद्ध करीत असतांना कुठलाही चुकीचा पायंडा पाडला जाणार नाही, याची कसोशीने काळजी घेत संस्थेच्या सर्व घटकांनी संस्थेच्या पर्यायाने समाजाच्या उन्नतीची सदा कास बाळगून मार्गक्रमण करावे असे त्यांनी सांगितले.

भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली, दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक भाषण संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, दिनदर्शिकेची माहिती विभागीय सहाय्यक व्यवस्थापक मिलिंद बोडखे, संचालन शाखा व्यवस्थापक किशोर कांबळे यांनी तर संस्थेचे सह सरव्यवस्थापक दत्ता बहादूरे यांनी आभार मानले.

# शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त केल्याबद्दल देवगिरी बँकेचा सहकार भारतीकडून सन्मान



**छत्रपती संभाजीनगर –** देवगिरी नागरी सहकारी बँकेस भारतीय रिझर्व्ह बँकेकडून 'शेड्यूल्ड बँक' हा दर्जा प्राप्त करणारी देवगिरी बँक ही मराठवाड्यातील पहिली नागरी सहकारी बँक ठरली आहे आहे. या कामगिरीबद्दल सहकार भारती आयोजित सहकारी बँकांच्या राज्यस्तरीय प्रशिक्षण परिषदेत देवगिरी बँकेचा सन्मान करण्यात आला.

शेड्यूल्ड बँक दर्जा मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कठोर निकषांची संपूर्ण पूर्तता देवगिरी बँकेने केली असून, देवगिरी बँकेचे हे यश मराठवाड्यातील सहकार चळवळीस चालना देणारे आहे. सहकारी बँकांवरील ग्राहकांचा आणि भागधारकांचा विश्वास अधिक दृढ होण्यास मोठी मदत होत आहे, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

आरबीआय संचालक सतीश मराठे आणि मुख्य महाव्यवस्थापक दीपक कनोजिया, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि सहकार भारती महाराष्ट्राचे अध्यक्ष दत्तात्रय चाळके उपस्थित होते. बँकेचे संचालक सुरेश जगाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी सन्मान स्वीकारला.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी बँकेच्या सन्मानाबद्दल सहकार भारतीचे आभार व्यक्त करतांना सांगितले की, शेड्यूल्ड बँक दर्जा हा कर्मचाऱ्यांची मेहनत, ग्राहकांचा विश्वास आणि संचालक मंडळाच्या सक्षम मार्गदर्शनाचा एकत्रित परिणाम आहे. जबाबदारीने, पारदर्शकतेने काम करण्याची प्रेरणा मिळेल. आगामी काळात जलद आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

# लिपिकांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरामध्ये विविध विषयांवर चर्चा

**हिंगोली –** ओमप्रकाश देवडा पीपल्स् को–ऑपरेटीव्ह बँकेच्या मुख्य कार्यालयात लिपिकांसाठी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांच्या हस्ते झाले. संचालक मंडळ सदस्य शशिकांत दोडल, मारोतराव बुद्रुक, राजेश अग्रवाल उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या प्रशिक्षण शिबीरात देशाच्या अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका, सहकाराची तत्त्वे, सहकारी बँकिंग, लेखा परीक्षण व अनुपालन, सायबर फ्रॉड रोखण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबतीत बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, महाव्यवस्थापक समता अग्रवाल, उपमहाव्यवस्थापक सुधीर मुळे, सहाय्यक महाव्यवस्थापक संजय घोडेकर यांनी मार्गदर्शन केले.

# नवीन सहकार धोरणावर चर्चेसाठी फेब्रुवारीमध्ये चर्चासत्राचे आयोजन

**अमरावती –** राज्याचे नवीन सहकार धोरणावर चर्चा करण्यासाठी येत्या फेब्रुवारी महिन्यात जिल्हा सहकार भारतीचे वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष रामेश्वर विधळे यांनी सांगितली. जिल्हा सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांची बैठक नुकतीच झाली. त्यावेळी ही माहिती सांगण्यात आली.

महामंत्री डी. एस. पवार यांनी प्रास्ताविकात बैठकीच्या आयोजनामागची भूमिका मांडली. सहकार भारतीच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती यावेळी सांगण्यात आली. संघटनमंत्री सतीश क्षीरसागर यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा सहकार भारतीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

सदस्यता नोदणी तसेच आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती यावेळी सांगण्यात आली

# सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना पुरस्कार भाऊराव चव्हाण साखर कारखान्यास

**नांदेड –** सहकार क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना म्हणून येथील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याला नुकताच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुणे येथे झालेल्या सहकार मंथन परिषदेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सहकार आयुक्त डॉ. संजय कोलते, राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आदी यावेळी उपस्थित होते. कारखान्यांचे कार्यकारी संचालक शाम पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला.

# कुबेरफल नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्‌घाटन

**नांदेड –** येथील कुबेरफल नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्घाटन नुकतेच झाले. यावेळी संत बाबा कुलवंतसिंघजी तसेच प्रादेशिक सहसंचालक विश्वास देशमुख माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, तसेच संस्थेचे पदाधिकारी, संचालक, नागरिक उपस्थित होते. संस्था अध्यक्ष हरप्रीतसिंघ मेजर, उपाध्यक्ष श्रीनिवास पांडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शीतल खांडिल यांनी केले तर पतसंस्थेचे अध्यक्ष हरप्रीतसिंघ मेजर, सचिव सतपालसिंघ खालसा, उपाध्यक्ष श्रीनिवास पांडे तसेच संचालक यांनी केले.

# गोदावरी अर्बनला पुरस्कार प्रदान

नांदेड – बेस्ट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून गोदावरी अर्बनचा बँकिंग एक्सलन्स अवॉर्ड प्रदान करून गौरव करण्यात आला. चेंबर ऑफ इंडियन मायक्रो यांच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल, लघुउद्योग मंत्रालयाचे विकास आयुक्त डॉ. राजेशन आदी उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक हेमंत पाटील अध्यक्ष राजश्री पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर आणि संचालक यांचे अभिनंदन करण्यात आले.

# आदर्श पतसंस्था एक हजार कोटी व्यवसायाचा टप्पा पार करणार - अध्यक्ष सुरेश पाटील



**रायगड** – एक हजार कोटींच्या एकत्रित व्यवसायाचे उद्दिष्ट मार्च २५ मध्ये निश्चित केले होते. त्या दिशेने सर्व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम केले. त्यामुळेच ९५० कोटींच्या टप्प्यावर पोहोचता आले. नजीकच्या काळात एक हजार कोटींचा टप्पा निश्चितपणे पार पाडू, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील यांनी व्यक्त केला.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेची २१ वी बोर्ली–मांडला शाखेचे उद्घाटन कार्यक्रमात सभासदांना मार्गदर्शन पाटील बोलत होते. प्रारंभी श्रीगणेश प्रतिमेसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन रेवदंडा ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ ग्रामस्थ शरद वरसोलकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले संस्थेच्या नूतन संचालिका श्रीमती सुचित्रा दिवाण व संस्थेचे संस्थापक सुरेश गणपत पाटील यांचे हस्ते झाले.

संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील संचालक व संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील, संचालक सतीश प्रधान रामभाऊ गोरीवले विलास सरतांडेल सुचित्रा दिवाण मुख्य कार्यकारी अधिकारी मीनाक्षी पाटील बोर्ली ग्रामपंचायत सरपंच सपना जायपाटील उपसरपंच प्रिया चुनेकर मुरुड पंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागावकर, समाज सेवक सरोज दिवेकर सदानंद पाटील गुरुजी ग्रामपंचायत सदस्य मनोज भोपी, सी. एम. ठाकुर सोनाली कासार आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, सर्व सामान्यांसाठी सर्व कर्जाना कमीत कमी कागद पत्रे व कमीत कमी व्याजदर आकारला जात असून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयास आदर्श करीत आहे. त्यासाठी सभासद कर्जदार ठेवीदार यांची मोलाची साथ हवी, असे आवाहन करून आदर्श पतसंस्थेप्रती व्यक्त केलेल्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही, अशी ग्वाही दिली.

# कल्याण सहकार भारतीच्या वतीने ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान

**कल्याण** – सहकार भारती कल्याण जिल्ह्याचे वतीने जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'साप्ताहिक विवेक'चे पूर्व संपादक ज्येष्ठ स्वयंसेवक रमेश पतंगे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आले. सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे उपस्थित होते.

यावेळी शिवाजी पाटील (माजी महामंत्री सहकार भारती), पद्माकर सराफ (माजी उपाध्यक्ष सहकार भारती), मोहन आघारकार (माजी अध्यक्ष कल्याण नागरी सहकारी बँक) उर्मिला प्रभुघाटे (माजी उपाध्यक्ष सहकार भारती), मुकुंद गुप्ता (माजी अध्यक्ष उल्हासनगर सहकार भारती), योगेश सोनगीरकर (माजी संगठन प्रमुख उल्हासनगर जिल्हा), अरुण जातेगांवकर (माजी विभाग प्रमुख ठाणे सहकार भारती), रामभाऊ शेट्ये (ज्येष्ठ कार्यकर्ते सहकार भारती), अरुण धारप (ज्येष्ठ कार्यकर्ते सहकार भारती), सुनीता लिमये यांना सन्मानित करण्यात आले.

सहकार भारतीचे कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार भारती माजी जिल्हा अध्यक्ष जे. आर. देशमुख यांचे निधन

**जळगाव** – सहकार भारतीचे माजी जिल्हा अध्यक्ष आणि महावीर सहकारी बँक उपाध्यक्ष जे. आर. देशमुख यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# कल्याण जनता सहकारी बँक आयोजित सीए, कर सल्लागार परिषदेत चर्चा

कल्याण – आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त कल्याण जनता सहकारी बँकेच्या वतीने सीए आणि कर सल्लागार यांच्यासाठी परिषद आयोजित करण्यात आली होती. यामध्ये शंभरपेक्षा अधिक व्यावसायिक सहभागी झाले होते. सीए मुकुंद चितळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

चितळे म्हणाले की, बँकेच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन नेट प्रॉफिट, नेट एनपीए आणि क्लिअर या तीन घटकांच्या माध्यमातून करता येते. व्यावसायिक प्रामाणिकता व्यावसायिक दृष्टिकोन आदी विषयांवर मार्गदर्शन केले. बँक उपाध्यक्ष मंगेश पाटील यांनी प्रास्ताविकात बँकेच्या आजवरच्या वाटचालीची तसेच विविध सेवांची माहिती सांगितली. गणेश शेळके सीए राकेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक मिलिंद नाईक यांनी आभार मानले.

# साखर उद्योगाचे अभ्यासक पी. जी. मेढे यांचे निधन



**कोल्हापूर** – साखर उद्योगाचे अभ्यासक आणि सहकार क्षेत्रातील मार्गदर्शक पी. जी. मेढे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, बहीण असा परिवार आहे. त्यांनी राजाराम कुंभी कासारी आणि भोगावती साखर कारखान्यांमध्ये कार्यकारी संचालक म्हणून काम केले आहे. साखर उद्योग क्षेत्रातील आंतर राष्ट्रीय घडामोडीचा अभ्यास ही त्यांची जमेची बाजू होती. साखर उद्योग क्षेत्रातील जगभरातील उत्पादन पद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान, बाजारातील चढ–उतार, प्रक्रिया तंत्रज्ञान, या विषयावर त्यांचा अभ्यास होता.

# दि कल्याण जनता सहकारी बँकेस ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान

**कल्याण** – सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल दि कल्याण जनता सहकारी बँकेस ग्रीन वर्ल्ड को–प्राईड पुरस्कार तसेच सहकार सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. जागतिक सहकार वर्ष निमित्त सहकार क्षेत्रातील प्रगती, अनुभवांचे आदान–प्रदान आणि भविष्यातील दिशांवर विचारमंथन घडवून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन २०२५ हा राज्यस्तरीय विचारमंच व सन्मान सोहळा पार पडला. उद्घाटन सहकार मंत्री, बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले.

सहकार क्षेत्रातील धोरणात्मक बदल, संस्थात्मक सुशासन, पारदर्शकता, सामाजिक बांधिलकी तसेच भविष्यातील संधी या विषयांवर परिषदेत चर्चा करण्यात आली. बँकेने ग्राहकाभिमुख सेवा, नियामक मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन, डिजिटल बँकिंगचा अवलंब तसेच




सामाजिक उत्तरदायित्त्व जपत केलेल्या कार्यामुळे सहकार क्षेत्रात वेगळी व विश्वासार्ह ओळख निर्माण केली सर्व बाबींची दखल घेत ग्रीन वर्ल्ड को–प्राईड हा पुरस्कार बँकेस प्रदान करण्यात आला. संचालक पंकज दांडेकर व्यवस्थापक मिलिंद फाटक उपस्थित होते.

# पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेला सहकार मंथन परिषदेत पुरस्कार प्रदान




**बीड** – ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन आणि कॉसमॉस सहकारी बँकेच्या वतीने जागतिक सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित 'सहकार मंथन' राज्यस्तरीय परिषदेत पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सहकार तत्वांचा प्रसार, व्यावसायिक प्रामाणिकता, सामाजिक जबाबदारी आणि जनहित जपणारी संस्था म्हणून पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेला सन्मानित करण्यात आले. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे व कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे तसेच ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्या हस्ते बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद राजुरीकर यांनी पुरस्कार स्वीकारला.

बँकेचे अध्यक्ष डॉ. प्रल्हाद कोकरे, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते तसेच पूर्णवादी बँकेतर्फे उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर, संचालक विश्वनाथ माणूसमारे–जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद राजुरीकर उपस्थित होते.

# गोदावरी अर्बनला ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान




**नांदेड** – सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल येथील गोदावरी अर्बनला ग्रीन वर्ल्ड को–प्राईड पुरस्कार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे सचिव रविंद्र रगटे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आदी उपस्थित होते.

सहकार मंत्री पाटील यांनी गोदावरी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. संस्थेचे संस्थापक हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला. संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर आणि अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

# दि यवतमाळ अर्बन बँकेला नुकतेच ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान



**यवतमाळ** – दि यवतमाळ अर्बन बँकेला नुकतेच ग्रीन वर्ल्ड को–प्राईड पुरस्काराने एका समारंभात गौरविण्यात आले. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर उपस्थित होते. अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे, उपाध्यक्ष अजिंदरसिंह चावला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे यांनी पुरस्कार स्वीकारला.

# देवगिरी सहकारी बँकेला ग्रीन वर्ल्ड को प्राईड पुरस्कार प्रदान

**छत्रपती संभाजीनगर** – जागतिक सहकार वर्षाचे औचित्य साधून ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन २०२५ सहकार परिषद आयोजित करण्यात आली होती. सहकार परिषदेत देवगिरी बँकेने सहकार क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत आदर्श कार्यपद्धती, सभासद हितसंवर्धन आणि सुयोजित आर्थिक व्यवस्थापनाबद्दल बँकेस ग्रीन वर्ल्ड को–प्राईड २०२५ पुरस्कार प्रदान करण्यात आला.




देवगिरी बँकेच्या वतीने बँकेचे संचालक नागनाथ काजळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी पुरस्कार स्वीकारला. बँकेने गेल्या काही वर्षांत सातत्यपूर्ण प्रगती साधली असून, मजबूत आर्थिक स्थिती, पारदर्शक प्रशासन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि ग्राहकाभिमुख सेवा यामुळे बँकेने सहकार क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच बँकेस मिळालेला 'शेड्युल्ड बँक' दर्जाही या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, देवगिरी बँकेस मिळालेला पुरस्कार हा सहकार मूल्यांशी बांधील राहून अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे. भविष्यातही बँक सामाजिक व आर्थिक विकासासाठी कार्यरत राहील.

# पंढरपूर अर्बन बँक ग्रीन वर्ल्ड पुरस्काराने सन्मानित



**पंढरपूर** – आंतराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ग्रीन वर्ल्ड को–प्राईड पुरस्कार आपल्या दि पंढरपूर अर्बन को–ऑप. बँकेला राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शतकोत्तर वाटचाल करीत असलेल्या आपल्या बँकेस ही सन्मानाची बाब असल्याचेही बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे यांनी सांगितले.

हा पुरस्कार बँकेच्या वतीने संचालक पांडुरंग घंटी, गणेश शिंगण, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे व व्यवस्थापक गणेश हरिदास, योगेश जगताप यांनी स्विकारला. सध्या बँकेने गृह व वाहन कर्जाबरोबरच महाराष्ट्र शासनाच्या आण्णासाहेब पाटील, वसंतराव नाईक, अशा विविध व्याज परतावा योजनामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून कर्ज पुरवठा करीत आहे, त्याचा फायदा व्यवसाय वृद्धीसाठी घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात काम करीत असणाऱ्या बहुसंख्य बँकांचा समावेश होता. महाराष्ट्र सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस बँकेचे सीए मिलींद काळे, ग्रीन वर्ल्डचे गौतम कोतवाल आदी उपस्थित होते.




# कृषी पणनच्या विकासात पणन संस्थांचे योगदान



श्री. सुखदेव भि. पाटील

आपला भारत देश हा मूलतः शेतीप्रधान आहे. शेती व्यवसाय हे येथील जनतेच्या उपजिविकेचे व रोजगाराचे प्रमुख स्त्रोत आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकरण, माहिती तंत्रज्ञान व सेवा क्षेत्राचा होत असलेला निरंतर विस्तार व विकास यामुळे शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे इतरत्र स्थलांतर होत आहे व त्यामुळे शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या अलिकडे दिवसेंदिवस हळुहळू कमी कमी होत चाललेली आहे. शेती व्यवसायात पूर्वापार चालत आलेल्या छुप्या बेरोजगारीची समस्या विचारात घेता असा बदल होणे अपेक्षितही होते/आहे. मानवी जीवनात शेती व्यवसायाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.शेती व्यवसायाचे अस्तित्त्व टिकवून ते विकसित करणे, ही काळाची गरज आहे.

**महाराष्ट्रातील शेती व शेतमाल पणनविषयक बाबी:-**

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाचा विचार करावयाचा झाल्यास येथील शेतमालाचे वार्षिक उत्पादन सुमारे रु.२ लाख कोटींचे आहे. राज्यात सध्या ३०७ मुख्य बाजार व त्यांचे ६२६ उप-बाजार आहेत. खाजगी/थेट/एकल परवानाधारक सुमारे २००० इतके आहेत. राज्यात कृषी पणनाची अशी दुहेरी व्यवस्था आहे. राज्यातील उपरोक्त शेतमाल उत्पादनापैकी बाजार समित्यांच्या आवारात विक्री होणाऱ्या शेतमालाचे मुल्य सुमारे रु.१ लाख कोटींचे व खाजगी/थेट/एकल परवानाधारकांनी खरेदी केलेल्या शेतमालाचे मुल्य सुमारे रु.२०,००० कोटीपर्यंत आहे. उर्वरित सुमारे रु.७५ हजार कोटी मुल्यांचा शेतीमाल उपलब्ध बाजार व्यवस्थेमध्ये विक्रीसाठी येत नाही. त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे गृहीत धरता येतील.

(१) शेतकऱ्यांकडे शेतमाल उत्पादनात विक्रीयोग्य आधिक्य नसणे.
(२) उसासारखा शेतमाल बाजार आवारात विक्रीसाठी आणला न जाणे.
(३) काही शेतमाल उत्पादने नियमन मुक्त असणे.
(४) शेतकऱ्यांना उपलब्ध बाजार व्यवस्थेची माहिती नसणे.
(५) बाजार समितीचे अंतर फार जास्त असणे
(६) घरगुती वापर व बियाण्यासाठी काही शेतमाल राखून ठेवला जाणे
(७) इतर अनुषंगिक कारणे.

शेतीप्रधान व्यवस्था असलेल्या आपल्या राज्यात ३०७ बाजार समित्यांपैकी उत्पन्नानुसार 'अ' वर्गीकरणात १९४,'ब' ५४,'क' २७ व 'ड' ३० बाजार समित्या आहेत.

एका बाजूला उत्पादित झालेला शेतमाल मोठ्या प्रमाणावर बाजारात विक्रीसाठी येत नाही आणि दुसऱ्या बाजूने उभारलेली बाजार व्यवस्था मोठ्या संख्येने आर्थिक अडचणीत/क्षमतेचा वापर न होण्याच्या स्थितीत आहे. या स्थितीत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी सहकारी पणन/प्रक्रिया संस्थांचा सहभाग वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

**महाराष्ट्रातील शेती व्यवसायाचा सध्याचा कल :-**

सन २००० पासून राज्यातील शेतकऱ्यांचा कल उच्च मुल्य कृषी उत्पादने, नगदी पिके घेण्याकडे वाढलेला आहे. परिणामस्वरुप राज्य फळे, भाजीपाला, डाळी, कापूस व सोयाबीनसारख्या पिकांच्या उत्पादनाचा देशातील सर्वात मोठे उत्पादक व निर्यातदार ठरले आहे.

**कृषीमाल उत्पादन व पणनाच्या सध्याच्या समस्या:-**

* राज्यातील कृषी क्षेत्राची वाढ आणि संरचनात्मक परिवर्तन असमान आहे.
  * शेतमालाच्या किंमतीतील चढउताराचा परिणाम अल्प व अत्यल्प भूधारकांवर अधिक होत आहे.
  * शेतमालाच्या किंमतीच्या हालचालीचा परिणाम शेतकऱ्यांच्या नफ्यावर होत आहे.
  * व्यापार धोरणामुळे कडधान्याच्या स्थानिक व्यापारावर परिणाम होत आहे.
  * कृषी पणन सुधारणांमुळे निर्मित नवीन क्षमता/संधींचा शेतकऱ्यांना पुरेसा फायदा होत नाही.
  * सर्वसमावेशक स्पर्धात्मक पुरवठा व मुल्यवृद्धी साखळी विकसन अपेक्षित प्रमाणात झालेले नाही.
  * तांत्रिक सेवा व जोखीम व्यवस्थापनातील पूरक गुंतवणूकीत पुरेशी वाढ झालेली नाही.
* शेतमाल उत्पादक व उद्यमींना (प्रक्रिया उद्योग) नवीन व संघटित बाजारपेठेत पुरेसा प्रवेश मिळालेला नाही.

**कृषी पणनाच्या नियमनाची राज्यातील विद्यमान व्यवस्था:-**

राज्यात कृषी उत्पन्नाच्या नियमनासाठी, 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम,१९६३ व नियम १९६७ पारित करण्यात आले.

सन २००३ मध्ये या अधिनियमात काही महत्त्वपूर्ण अशा सुधारणा करण्यात आल्या. कायद्याचे नाव बदलून, 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ असे करण्यात आले.

**या कायद्याचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:-**

* शेतकऱ्यांचा शेतमाल योग्य रीतीने विकला जावा
* शेतकऱ्यांच्या मालाचे वजन योग्यरित्या व्हावे
* शेतकऱ्याने विक्री केलेल्या मालाची किंमत त्यास तात्काळ मिळावी
* शेतकऱ्यांची मध्यस्थांकडून फसवणूक होऊ नये
* शेतमाल खरेदीदाराला एकत्रित माल मिळावा.
* दर्जेदार शेतमाल उत्पादनास उत्तेजन मिळावे.

**बाजार समित्या व पणन सहकारी संस्था: मूलभूत फरक :-**

**बाजार समित्या:-**

बाजार समित्या या ममहाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७ नुसार स्थापित व शेतकऱ्यांच्या शेतम ालाच्या खरेदी किंवा विक्रीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविणाऱ्या व त्या

पुढील पानावर...

अनुषंगाने नियमन करणाऱ्या संस्था आहेत.

**सहकारी पणन संस्था:-**

सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक सहकारी संस्था या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ नुसार स्थापित करण्यात येतात. या संस्थांचे उद्देश व भूमिका व्यापक स्वरूपाची आहे. महाराष्ट्र राज्यात सध्या एकूण १३७० सहकारी पणन प्रक्रिया संस्था असून त्यांची सभासद संख्या सुमारे १०.४० लाख इतकी आहे.

या सहकारी संस्था दोन टप्प्यात आपल्या भूमिका पार पाडतात.

**अ) शेतमाल उत्पादनाशी निगडित बाबी:-**

शेतकऱ्यांना शेतमालाचे दर्जेदार उत्पादन करण्यासाठी पोषक हवामानासह पुढील घटक आवश्यक असतात. जसे - सिंचन, वित्त, बियाणे, खते, किटक व जंतू नाशके, अवजारे, मार्गदर्शन. शेतकऱ्यांना या सुविधा सहकारी पणन व अन्य संस्थांकडून पुरवल्या जातात.

**आ) शेतमाल पणन विषयक बाबी:-**

शेतमालाचे उत्पादन केल्यानंतर ते ग्राहक, उद्यमींपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांची करावी लागणारी प्रतवारी, प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवण, वाहतूक, खरेदी व विक्री या बाबींसंबंधी कामकाज पणन, प्रक्रिया व अन्य संस्था करतात.

अशा प्रकारे सहकारी पणन व प्रक्रिया व अन्य सहकारी संस्था ह्या शेतकऱ्यांना शेतीचे दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि शेतमाल विक्रीसाठी सहाय्य करणाऱ्या संस्था आहेत.

**प्रमुख कृषी पणन व प्रक्रिया संस्था:-**

राज्यातील कृषी पणन व प्रक्रिया संस्थांचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

* तालुका खरेदी विक्री संघ
* जिनिंग व प्रेसिंग सहकारी संस्था
* कृषी उत्पादन प्रक्रिया संस्था
* ग्राहक सहकारी संस्था
* फळे व भाजीपाला सहकारी संस्था
* म.रा. सहकारी पणन महासंघ म.,मुंबई
* विदर्भ को-ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशन मी.,नागपूर
* म.रा.स. ग्राहक महासंघ म.,मुंबई
* म.रा.स.कापूस उत्पादकांचा महासंघ म., नागपूर

**स्मार्ट प्रकल्प व पणन सहकारी संस्था**

राज्यातील कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तनासाठी सध्या मा.बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) राबविण्यात येत आहे.

**या प्रकल्पाचा उद्देश:-**

या प्रकल्पाचा उद्देश राज्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी आणि कृषी व्यवसायीकांसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे हा आहे.-

(१) कृषी उत्पादनाचे विपणन व त्याबाबत व्यापारात येत असलेले धोके टाळणे किंवा कमी करणे.

(२) कृषी उत्पादनाच्या किंमतीतील चढ-उतार व अनिश्चितता यातील जोखीम कमी करणे/योग्य जोखीम व्यवस्थापन करणे.

(३) कृषी प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणे.

(४) शेतमालाची पुरवठा व मुल्यवृद्धी साखळी विकसित करणे.

(५) शेतकरी उत्पादक कंपन्या/संघटनांमार्फत शेतमालाला आंतरराज्यीय व जागतिक बाजार मिळवून देणे.

**स्मार्ट प्रकल्प अंतर्गत क्षमता विकास प्रशिक्षण :-**

स्मार्ट प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीचा एक भाग म्हणून राज्यातील पणन विभागाचे क्षेत्रिय अधिकारी(४००) व बाजार समित्यांचे कर्मचारी (१२००) यांना सन २०२४-२५ मध्ये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशोदा) मार्फत सखोल प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणाचा उद्देश पुढीलप्रमाणे होता.-

(१) अधिकारी/कर्मचारी यांच्यातील क्षमता विकसित करणे.

(२) कृषी पणनातील विवाद निवारण यंत्रणा बळकट करणे.

(३) कृषी पणनातील नियमन व्यवस्था सुधारणे.

**प्रशिक्षण अभ्यासक्रमात सहकारी पणन संस्थांचा समावेश:-**

स्मार्ट प्रकल्पांतर्गत या प्रशिक्षणासाठी जे विषय/उपविषय निश्चित करण्यात आले होते. त्यातील एक महत्त्वाचा विषय, 'सहकारी पणन संस्थांमार्फत कृषी पणनचा विकास' असा आहे.

कृषी पणनच्या विकासात सहकारी संस्थांचा, विशेषतः पणन व प्रक्रिया संस्थांचा सहभाग वाढवून घेण्यासाठी या संस्थांचे सदस्य, समिती सदस्य व कर्मचारी यांचा प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग असणे अपेक्षित आहे. मात्र या घटकांचा सहभाग झाला नाही.

त्यामुळे,या संस्थांची भूमिका शेतमाल उत्पादन व शेतमालाची खरेदी-विक्री या सर्व आघाड्यांवर महत्त्वाची असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची नितांत आवश्यकता आहे.

**सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक संस्थांचे संभाव्य योगदान:-**

सहकारी पणन संस्था व इतर अनुषंगिक संस्था कृषी व्यवसाय विकास व पणनच्या विकासात पुढीलप्रमाणे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

* सामाजिक भांडवल उभारणीस चालना देणे.
* आवश्यक त्या पायाभूत सुविधांची उभारणी करणे.
* विविध सहकारी संस्थांमध्ये आपसी समन्वय स्थापून उद्देशपूर्तीसाठी कामकाज करणे.
* कृषी व्यवसाय अर्थक्षम करण्यात सक्रिय योगदान देणे.
* कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावणे.

**प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था:-**

स्मार्ट प्रकल्पाच्या अंमलबजावणीत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा सहभागदेखील अपेक्षित केलेला आहे.

या संस्था शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारा वित्तपुरवठा करतात. याशिवाय काही संस्था या बियाणे, खते, औषधे व अवजारे देखील पुरवतात. या संस्था आता बहुउद्देशीय संस्था म्हणून काम करताना अनेक उपक्रम हाताळू शकणार आहेत. केंद्र शासनाच्या धान्य भांडारण योजनेत या संस्थांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे. बियाणे, निर्यात व सेंद्रिय क्षेत्रात कामकाज करण्यासाठी स्थापन केलेल्या तीन बहुराज्यीय संस्थांच्या कामातही या संस्थांचा सहभाग असणार आहे.

कृषी पणनच्या विकासासाठी आवश्यक असलेली शेतमालाची पुरवठा व मुल्य साखळी विकसन करणे, शासनाच्या कृषीमाल निर्यात धोरणाची अंमलबजावणी करणे, यात चांगल्या रितीने योगदान देऊ शकतात.

**सहकारी पणन संस्थांच्या कामकाजाची संभाव्य व्याप्ती :-**

सहकारी पणन संस्था शेतकऱ्यांना कृषी मालाच्या पणन विषयक सुविधा पुरवतात.

सद्यस्थितीत या संस्थांकडून पुढीलप्रमाणे काही बाबी हाताळणे शक्य होऊ शकते.

* मूल्य साखळी विकसन करणे.
* कृषी उत्पादनाची प्रतवारी करणे.
* कृषी उत्पादनाचे वेष्ठनिकरण करणे.
* कृषी उत्पादनाची साठवणूक करणे.
* कृषी उत्पादनाची वाहतूक करणे.
* कृषी उत्पादनांची इ-प्रणालीद्वारे विक्री करणे.
* कृषी उत्पादनासाठी देशांतर्गत व जागतिक बाजारपेठ उपलब्ध करणे.
* सध्या कृषी पणनातील सुधारणा, जागतिक व देशांतर्गत संधींचा लाभ खाजगी व्यक्ती आणि संघटना घेत आहेत. तो लाभ अल्प व अत्यल्प

**पुढील पानावर...**

## बहुराज्यीय संस्थाबाबत केंद्र सरकारची उपाययोजना फायदेशीर

पुणे – बहुराज्यीय संस्थाबाबत केंद्र सरकारकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजना सहकार चळवळीस फायदेशीर ठरणार असल्याचे मत पुणे बँक्स असोसिएशनचे सचिव सुभाष मोहिते यांनी व्यक्त केले आहे.

बहुराज्यीय सहकारी संस्थेचा व्यवसाय चुकीच्या पद्धतीने होत असेल तर त्याबाबतची चौकशी करण्याचा अधिकार केंद्रीय निबंधक यांना देण्यात आला आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी संस्थांना आपली बाजू मांडण्याची संधी या देखील महत्त्वपूर्ण बाबी आहेत, असे ते म्हणाले. सरकारने नव्याने केलेल्या दुरुस्तीमुळे केंद्रीय सहकार निबंधक यांना अधिकार मिळणार आहेत. यामुळे सहकारी संस्थांवर वचक राहणार आहे. त्यासाठीची आवश्यक यंत्रणा निर्माण झाल्यास बहुराज्यीय संस्थांच्या दृष्टीने चांगली बाब ठरणार आहे, असे ते म्हणाले.

## तिरुपती पतसंस्था आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे** – येथील तिरुपती नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १००१ रक्तदात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्व. रामगोपाल पुंगलिया यांच्या पुण्यस्मरणार्थ शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश राख यांच्या हस्ते झाले. शिबिरात सहभागी रक्तदात्याचा सत्कार करण्यात आला. संस्था संस्थापक अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया, अध्यक्ष संतोष चोपडा आदी उपस्थित होते.

# सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी

**वसई** – सहकार भारती सहकारी प्रशिक्षण सहकारी संस्था व पालघर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँकांच्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांसाठी कर्ज वसुली बाबतचा दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग येथे आयोजित करण्यात आला होता.

अभ्यासवर्गाचे उद्घाटन बेसिन कॅथलिक को. ऑप. बँकेचे अध्यक्ष डायस यांच्या हस्ते झाले. पालघर जिल्हा उपनिबंधक कुलकर्णी पालघर तालुका उपनिबंधक गुजराथी व वसई तालुका उपनिबंधक शिंदे उपस्थित होते. अभ्यासवर्गात महाराष्ट्र सहकारी कायद्यातील, कर्ज वसुली संबंधित कलम व नियमांची सविस्तर माहिती तसेच त्याचा प्रभावी वापर कसा करावा याची माहिती सांगण्यात आली. जोखीम व्यवस्थापन, ए. एल. एम. आयकर व वस्तू सेवा कर या विषयांवर ही सत्राचे आयोजन केले होते. जनसेवा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कल्पक वर्तक, डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे कार्यपालक अधिकारी भुषण जोसेफ, निवृत्त जिल्हा उपनिबंधक धरणीधर पाटील, मालाड सहकारी बँकेचे संचालक भूषण पैठणकर या तज्ञांनी मार्गदर्शन केले.

अभ्यासवर्गात २५ सहकारी पतसंस्था व ३ नागरी सहकारी बँकांचे अधिकारी – कर्मचारी सहभागी झाले होते. अभ्यासवर्ग यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षण संस्थेचे संचालक सदानंद पावगी, वसई येथील कार्यकर्ते मीनल वैद्य, शेखर गायकवाड व उमेश मुंडले यांनी परिश्रम घेतले.

**मागील पानावरून...**

भूधारक शेतकऱ्यांना मिळवून देणे.

- कृषी प्रक्रिया उद्योगांवर लक्ष केंद्रित करणे.
- अल्प व अत्यल्प भूधारकांना स्वतःशी जोडून घेऊन त्यांना विविध सेवा पुरवणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे.
- सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक कृषी मूल्य साखळी विकासनात सहभाग घेणे व प्रोत्साहन देणे.
- शेती क्षेत्रातील विविध उपक्रमांची वाढ करण्यास सहभाग घेणे व प्रोत्साहन देणे.
- शेतकऱ्यांचा बाजारपेठेत प्रवेश विस्तार करण्यासाठी संस्थात्मक मदत करणे.
- किंमत जोखीम निवारण व्यवस्था उभारणे.
- कृषी प्रणालीतील परिवर्तनास गती देण्यात योगदान देणे.
- या संस्थांनी आपली व्यवस्थापन क्षमता वाढविणे.

**पणन व प्रक्रिया संस्थांसाठी कामकाजाची सद्यस्थिती पाहता आवश्यक कृती कार्यक्रम:–**

(१) संघीय संस्थांनी आपल्याशी संलग्न असलेल्या प्राथमिक पणन संस्थांचे क्रियान्वयन व बळकटीकरण करणे.

(२) संघीय संस्थांनी स्वत: अधिक क्रियाशील व बळकट होण्यासाठी प्रयत्न करणे.

(३) संघीय संस्था व संलग्न प्राथमिक संस्थांनी अंतर्गत मूल्य साखळी विकसित करणे

(४) संघीय व संलग्न प्राथमिक संस्थांनी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

(५) सभासद शेतकऱ्यांच्या शेती उत्पादन वाढीसाठी कृषी सेवांचा पुरवठा व मार्गदर्शन करणे.

(६) शेतकरी सभासदांच्या उत्पादनाची थेट खरेदी करणे.

(७) प्रक्रिया करण्यासाठी पर्याय शोधणे व त्यातून मुल्यवृद्धी होईल असे पाहणे.

(८) संघीय व संलग्न प्राथमिक संस्थांनी मिळून गुणवत्तापूर्ण उत्पादन, प्रतवारी, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक व विक्री या माध्यमातून मुल्य साखळी निर्माण करणे.

(८) संघीय संस्थांनी कृषी प्रक्रिया करणाऱ्या संस्था किंवा सदस्यांसाठी उद्योग/व्यवसाय सुलभतेसाठी सहाय्य व मार्गदर्शन करणे. शेतकरी आणि पणन व प्रक्रिया संस्थांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे.

(९) संघीय संस्था, संलग्न प्राथमिक संस्था व शेतकरी सभासद यांनी संघटीत प्रयत्न करून विस्तारीत बाजारपेठेचा अंतिमतः शेतकऱ्यांना लाभ मि ळवून देणे.

**श्री. सुखदेव भि. पाटील** (मो.९६३७४३४७२१)
Email- sukdeobpatil@gmail.com
(लेखक महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील अपर आयुक्त तथा सहसचिव पदावरून सेवानिवृत्त आहेत.)

*****

# सांगली सहकार भारती आयोजित परिषदेत नवीन सहकार धोरणावर व्यापक चर्चा



**शिराळा, सांगली** – महाराष्ट्र राज्यात नवीन सहकार धोरण अस्तित्वात येणार आहे. हे धोरण लोकसहभागातून तयार होणार आहे, अशी माहिती शासनाच्या नवीन धोरण समितीचे सदस्य व सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी सांगितली.

**✲ नवीन सहकार धोरण आणि अपेक्षा यावर चर्चासत्र –**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व राष्ट्रीय सहकार सप्ताहानिमित्त सांगली जिल्हा सहकार भारती (ग्रामीण) व महानगराच्या वतीने 'नवीन सहकार धोरण – अपेक्षा' यावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून समिती सदस्य व युवा डेव्हलपमेंट को–ऑप. बँकचे अध्यक्ष डॉ. चेतन नरके होते. कर्मवीर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा श्रीमती भारती चौपडे यांनी चर्चासत्राचे उद्घाटन केले.

सहकार तज्ञ आणि दत्त सहकारी पतसंस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, राज्य सहकारी संघाचे संचालक डॉ. प्रताप पाटील, दीनदयाळ सहकारी सूत गिरणीचे सरव्यवस्थापक विनोद देशमुख, सांगली जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे ए. डी. पाटील विकास सेवा संस्था तज्ञ विठ्ठल निकम उपस्थित होते. प्रारंभी सहकार भारतीचे संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक सहकार भारती महानगरचे अध्यक्ष शशिकांत राजोबा यांनी करून चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. श्रुती जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**✲ विद्यापीठात सहकार अभ्यासक्रमासाठी प्राधान्य हवे –**

सहकार भारती जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन, महिला प्रमुख सारिका मुळे, महामंत्री सर्वश्री शैलेश पवार, भारत निकम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. डॉ. पाटील म्हणाले, कर्जमुक्तीचे पैसे शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग न करता शेतकऱ्यांच्या कर्जखात्याला वर्ग केले पाहिजेत. श्री दत्तचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी म्हणाले, धोरण ठरवताना ज्याप्रमाणे केंद्र शासनाने गुजरातमध्ये त्रिभुवनदास विद्यापीठाची स्थापना करून सहकार अभ्यासक्रमाचे नियोजन केले. राज्याचे सहकार धोरणात विद्यापीठात सहकार अभ्यासक्रमासाठी प्राधान्य दिले पाहिजे.

**✲ पतसंस्थासाठी वसुली प्राधिकरण निर्माण करावे –**

सहकार भारतीचे प्रदेश प्रमुख परमणे यांनी धोरण मसुद्यात काय गरजेचे आहे, याबाबत विवेचन केले. ते म्हणाले, शासनाने पतसंस्थासाठी वसुली प्राधिकरण निर्माण केले पाहिजे. जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक प्रक्रिया दोषमुक्त असणे गरजेचे आहे.

उद्घाटक श्रीमती भारती चौपडे यांनी धोरणात काय असावे याबाबत उहापोह केला.

**✲ लोकसहभागातून नवे धोरण तयार होणार –**

देशात साडेआठ लाख सहकारी संस्था असून ३५ कोटी लोक सहकाराशी जोडलेले आहेत, असे जुगादे म्हणाले. महाराष्ट्रात सव्वा दोन लाख सहकारी संस्था असुन ८ कोटी लोक सहकाराशी जोडले आहे. केंद्राचे सहकार धोरण जाहीर झाले आत्ता राज्याचे धोरण करायचे आहे. नवीन सहकार धोरण परिपूर्ण होण्यासाठी सर्व धोरणांचा अभ्यास करून लोकांच्या, तज्ञांच्या सूचनांचा अंतर्भाव करून नवीन सहकार धोरण केले जाईल. प्रत्येक जिल्ह्यात चर्चासत्राचे आयोजन करून लोकसहभागातून नवे धोरण तयार होणार असे ते म्हणाले.

**✲ परिपूर्ण सहकार धोरणाची आवश्यकता –**

डॉ. नरके यांनी सहकार क्षेत्राचा उहापोह केला. ते म्हणाले, सहकाराचा विस्तार होत असताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सहकाराचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. यासाठी एका परिपूर्ण सहकार धोरणाची आवश्यकता आहे, यासाठी समिती गठित केली असून त्यावर काम सुरू आहे. सहकार क्षेत्रात काम करणाऱ्यानी शॉर्टकट प्रवृत्तीचा त्याग करून दीर्घकालीन ग्लोबल स्पर्धा कशी करू याचा विचार केला पाहिजे.

प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन, तासगाव अर्बन अध्यक्ष हिंगमिरे, तसेच संग्राम कुलकर्णी, बाळासाहेब खुड्डे, डॉ. ज्ञानचंद्र पाटील, संपदा आरवाडे, संदीप कुलकर्णी, कर्मवीर पतसंस्थेचे उपाध्यक्ष, संचालक, अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन अवधूत ठोके व आभार महानगर महामंत्री शैलेश पवार यांनी मानले.

# ग्राहकांचा सन्मान पारदर्शक सेवा यामुळे बँकिंग क्षेत्र बळकट होईल

**पुणे** – ग्राहकांचा सन्मान पारदर्शक सेवा, ग्राहकांच्या हिताच्या विविध योजनांची माहिती देणे, ही प्रत्येक सहकारी बँकेची जबाबदारी आहे. तसे झाल्यास बँकिंग क्षेत्र अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे, असे मत बँकिंग तज्ञ आणि राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे. विद्या सहकारी बँकेने नुकतेच ५२ व्या वर्षात पदार्पण केले नवी पेठ शाखेचे स्थलांतर करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बँकेच्या सध्या १३ शाखांमधून ६४७.५२ कोटींचा व्यवसाय केला आहे. बँक उपाध्यक्ष नितिन किवळकर, तसेच संचालक, खातेदार, नागरिक उपस्थित होते. शाखाधिकारी चंद्रशेखर देशपांडे यांनी आभार मानले.

# सांगली अर्बन बँकेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**शिराळा** – सांगली अर्बन को–ऑप बँकेच्या सन २०२६–२७ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन सहकार भारती सांगली जिल्हा (ग्रामीण)चे अध्यक्ष व बँकेचे सल्लागार सुमंत महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. संचालिका आश्विनी आठवले उपस्थित होत्या.

शाखा व्यवस्थापक राजेंद्र काटकर यांनी स्वागत व प्रास्ताविक करून माहिती सांगितली. सहायक व्यवस्थापक प्रकाश जोशी यांनी पुढील तीन महिन्यांत कार्यक्रम, उपक्रम याचची माहिती सांगितली. सुमंत महाजन, आश्विनी आठवले, शाखा सल्लागार वसंत यादव यांच्या हस्ते दिनदर्शिका प्रकाशन करण्यात आले. आठवले यांनी बँकेची सविस्तर माहिती सांगितली. महाजन यांनी मनोगत व्यक्त करून सहकार भारती व बँक सहकार क्षेत्रात एकमेकांना पूरक काम करत आहे असे सांगितले. रोहित पाटील, संध्या कुरणे, शिवाजी पाटील, शंकर पाटील उपस्थित होते. प्रकाश जोशी यांनी आभार मानले.

# सहकारांतर्गत सहकारामुळे चळवळीला बळकटी – प्रा. दुर्गाडे

**पुणे** – सहकारांतर्गत सहकार अधिक व्यापक होत असल्याने सहकार चळवळीला बळकटी मिळत आहे, असे मत पुणे जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी व्यक्त केले आहे. बँकेच्या वतीने आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या हस्ते करण्यात आले.

आरबीआयने जारी केलेली सुधारित धोरणे, त्याचा तुलनात्मक अभ्यास कार्यपद्धती, अंमलबजावणी बाबतचा कृती आराखडा तयार करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सनदी लेखापाल उदय कुलकर्णी, अकोला वाशिम जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, ठाणे जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पटारे, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद गावडे, परभणी जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरुंदकर, सातारा जिल्हा सहकारी बँक सरव्यवस्थापक राजेंद्र गाढवे आणि राज्यातील १५ सहकारी बँकांचे वरिष्ठ अधिकारी यामध्ये सहभागी झाले होते.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी प्रास्ताविक तर सरव्यवस्थापक संजय शितोळे यांनी आभार मानले.

# भारत विकास परिषद दिव्यांग केंद्राच्या वतीने २२५ दिव्यांगांना साहित्य वाटप

**पुणे** – महाराष्ट्र नॅचरल गॅसच्या सी. एस. आर. फंडातून दिव्यांगांना आत्मनिर्भर व जीवन जगण्यासाठी आधार देण्याचे काम भारत विकास परिषद दिव्यांग केंद्र करीत आहे. त्यांच्या प्रत्यक्ष सेवेची संधी मिळाली, असे संयोजक दिलीप जयराम लोहार यांनी सांगितले.

दिव्यांग बांधवांचा हात पाय मोजमाप कार्यक्रम नुकताच पार पडला. सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर, आमदार काशीराम पावरा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ धुळे जिल्हा संघचालक हितेंद्र जैन, माजी जि. प. अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, भारत विकास परिषद दिव्यांग केंद्राचे विनय खटावकर, डी. वाय. एस. सी. गोसावी सहकार भारतीचे राष्ट्रीय पदाधिकारी दिलीप पाटील, प्राचार्य डॉ. पी. एस लोहार रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेले रुधिर सेवा समिती पनवेलचे उन्मेष मोतीलाल लोहार, लोहार समाज महासंघ माजी अध्यक्ष अमृत लोहार, लोहार महासंघ अध्यक्ष प्रदीप लोहार शिरपूर शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रातील, तसेच महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश येथील नागरिक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

एकूण २२५ दिव्यांग बांधवांना प्रत्यक्ष अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित हात–पाय व कॅलिपर (बाजार मूल्य नव्वद लाखांपेक्षा जास्त असलेले) प्रदान करण्यात आलेत.

आयोजन समिती जनकल्याण पतसंस्था, श्री हनुमान व्यायाम मंदिर ट्रस्ट, श्री गाडीलोहार समाज मंडळ शिरपूर शहर व तालुका, स्व. दादा देवराम लोहार जनकल्याण प्रतिष्ठान शिरपूर या संस्थांचे वतीने आयोजन करण्यात आले होते.

# राज्य सहकारी बँकेमध्ये आयबीपीएसच्या माध्यमातून भरती प्रक्रिया होणार

**पुणे** – यापुढील काळात राज्य सहकारी बँकेमध्ये आयबीपीएसच्या माध्यमातून कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया करण्यात येणार आहे, अशी माहिती बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली. एकूणच भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि शिस्त यावी यासाठी निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत असे नमूद करून ते म्हणाले, हे लक्षात घेता बँकेने स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून परीक्षा घेण्याचे धोरण सन २०२१ पासून स्वीकारले आहे. या धोरणाचा विस्तार करून शिपाई आणि वाहनचालक पदाच्या भरतीसाठी परीक्षा घेण्यात आली. या प्रक्रियेमुळे सहकारी बँक क्षेत्रातील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास मदत होत आहे. सहकारी बँकिंग क्षेत्रात शिस्त आणि विश्वास निर्माण करण्यासाठी सर्व सहकारी बँकांनी या पद्धतीचा अवलंब करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



# सहकार भारती कोल्हापूरच्या वतीने ४० सहकारी संस्थाचा सन्मान

## डॉ. उदय जोशी 'सहकार दीप' व विवेक जुगादे 'सहकार दूत' पुरस्काराने सन्मानित

**कोल्हापूर** – सहकार भारती कोल्हापूरच्या वतीने जिल्ह्यातील उत्कृष्ट ४० सहकारी संस्थांचा सन्मान करण्यात आला. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या निमित्ताने सहकार भारती कोल्हापूर जिल्हा यांच्या वतीने जयसिंगपूर येथे सहकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांना 'सहकार दूत' या पदवीने तसेच सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी यांना 'सहकार दीप' या पदवीने तर जयसिंगपूरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांना 'विकासरत्न' या पदवीने सन्मानित करण्यात आले.

तसेच प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे, जयसिंगपूर नगराध्यक्ष संजय पाटील, बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख सागर चौगुले, विभाग संघटक चंद्रकांत धुलप, सहसंघटक जवाहर छाबडा, अध्यक्ष अरविंद मजलेकर, संघटक सागर हुपरे, संजय सातपुते, धोंडीराम पागडे, सीए मंदार धर्माधिकारी, सुषमा पाटील, सुरेखा कुंभार, सारिका मुळे, श्रीकांत चौगुले, अमोल पाटील, संजय सातपुते, सुरेखा कुंभार, आर्य चाणक्यचे अध्यक्ष राजेंद्र राशिनकर, कर्मवीर अध्यक्ष रमेश पाटील यांचेसह विविध संस्थांचे पदाधिकारी संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्य प्रायोजक आवाडे इचलकरंजी जनता सह बँक कर्मवीर मल्टीस्टेट व आर्य चाणक्य परिवार होते.

सध्याच्या सहकाराची दिशा याचबरोबर राज्याचे प्रस्तावित सहकार धोरण, महिला व युवकांचा सहभाग यांसह विविध विषयांवर चर्चा झाली.

या कार्यक्रमास सहकार भारती कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष अरविंद मजलेकर, सहकार भारती कोल्हापूर जिल्हा महामंत्री श्रीकांत पाटील यांच्यासह कोल्हापूर जिल्हा सहकार भारतीचे पदाधिकारी तसेच विविध संस्थेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सहकारी बँक, विकास संस्था, पतसंस्था, शिक्षक पतसंस्था, दूध संस्था अशा संस्थांचा आदर्श सहकारी संस्था म्हणून सन्मान करण्यात आला.

## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

सोलापूर – सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गीरे यांच्या हस्ते करण्यात आले. फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी तसेच संचालक, अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे यांनी यांनी भाषणात सहकारी पतसंस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. ग्रामीण अर्थकारणाला गती आणि आधार देण्यासाठी पतसंस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. फेडरेशनच्या वतीने सहकारी पतसंस्थाना मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## सोलापूर जिल्हा पतसंस्था महासंघाचे प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार

**सोलापूर** – सोलापूर जिल्हा पतसंस्था महासंघाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यांची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांनी येथे सांगितले. महासंघाच्या कार्यालयास त्यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

येथील पंचवटी नागरी सहकारी पतसंस्था कार्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली. महासंघ अध्यक्ष दिलीप पतंगे, व्यवस्थापिका मीनाक्षी कैची, मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पतंगे तसेच उद्योजक एस. एस. शिंदे, राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आदी उपस्थित होते. महासंघाच्या महत्त्वपूर्ण कामामुळे जिल्ह्यातील सहकारी पतसंस्था अधिक सक्षम झाल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

## सहकार संस्कृती विषयावर तयार केलेली दिनदर्शिका स्वागताई

**पुणे** – सहकाराच्या माध्यमातून सर्वांचा सामूहिक विकास ही भूमिका समोर ठेवून राज्य सहकारी बँकेने सहकार संस्कृती या विषयावर तयार केलेली दिनदर्शिका स्वागतार्ह आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून बँकेच्या वतीने दिनदर्शिका तयार करण्यात आली आहे. त्याचे प्रकाशन झाले, त्यावेळी ते बोलत होते.

बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे, आमदार राहुल कुल तसेच अधिकारी उपस्थित होते. दिनदर्शिका शब्दांकन आणि संकल्पना प्रशासक अनास्कर यांची आहे. ते म्हणाले, जनमानसात सहकार क्षेत्राची प्रतिमा ढासळत असून सहकार संस्कृतीचे जतन करण्याची गरज आहे, याचा फायदा भविष्यात सहकार क्षेत्राला नक्कीच होणार आहे.




# ताणतणावाचे नियोजन करण्याची आवश्यकता - डॉ. दत्ता कोहीनकर

**पुणे –** रोजच्या धावपळीच्या कामात होणारी दमछाक आणि मानसिक तणाव कमी करण्यासाठी चांगल्या प्रकारे कामकाजाचे नियोजन करण्याची गरज आहे, असे मत डॉ. दत्ता कोहीनकर यांनी व्यक्त केले. पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ताणतणावाचे नियोजन हा व्याख्यानाचा विषय होता.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षनिमित्त व्याख्यानाचे आयोजन बँक प्रतिनिधी यांच्यासाठी करण्यात आले होते. असोसिएशनचे अध्यक्ष नीलेश ढमढेरे, उपाध्यक्ष रमेश वाणी, मानद सचिव सुभाष मोहिते, तसेच संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. अध्यक्ष ढमढेरे यांच्या हस्ते डॉ. कोहीनकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुभाष मोहिते जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर, मनोगत व्यक्त केले. वाणी यांनी आभार मानले.

# कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँकेच्या बेळगाव शाखेचे उद्घाटन

**इचलकरंजी –** कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँकेचा बेळगाव येथील ५५ व्या शाखेचा उद्‌घाटन सोहळा माजी नगराध्यक्षा किशोरी आवाडे यांच्या हस्ते व सपना आवाडे तसेच बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे यांच्या उपस्थितीत झाला.

बँकेच्या विस्तारातील हा महत्त्वपूर्ण टप्पा असून, सीमावर्ती भागातील नागरिक, व्यापारी, उद्योजक व शेतकरी यांना आधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. बँकेचे अध्यक्ष आवाडे यांनी मनोगतात कर्नाटक राज्यातील चिकोडी ही ९वी शाखा असून बँकेचा सहकार चळवळीतील योगदानाचा उल्लेख करत, पारदर्शकता, विश्वास व ग्राहकसेवा हीच बँकेची ओळख असल्याचे सांगितले.



आदिनाथ शेट्टी, ॲड. एस. के. उत्तरे, प्रवीण घोसारवडे, अनिल अमन्नावर, पोपटलाल शहा शेठजी, बँकेचे उपाध्यक्ष संजयकुमार अनिगोळ, व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत चौगुले, बँकेचे सीईओ संजय शिरगावे, संचालक बंडोपंत लाड, बाबुराव पाटील, बाळकृष्ण पोवळे, महेश सातपुते, सुभाष जाधव, श्रीशेल कित्तुरे, शैलेश गोरे, सचिन देवरुखकर, सचिन केस्ते, योगेश पाटील, जवाहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक शीतल अमन्नावर, सुमेरु पाटील, बँकेचे जनरल मॅनेजर दीपक पाटील, किरण पाटील, जावेद कुरणे, आण्णा नेर्ले, अस्लम बैरागदार, शाखाधिकारी भरत रुग्गे यांच्यासह इतर मान्यवर व स्थानिक व्यापारी, नागरिक उपस्थित होते.

# सहकार कायद्यातील बदलासाठी १६ सदस्यांची समिती गठीत

**पुणे –** सध्याच्या प्रचलित सहकार कायद्यातील बदलासाठी राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती तयार करण्यात आली आहे आणि ही समिती येत्या दोन महिन्यात अहवाल देणार आहे.

या समितीकडून सहकार कायदा आणि नियमामध्ये करावयाच्या सुधारणाबाबतचा अहवाल यावर विचार करून अहवाल देणार आहे. या समितीमध्ये साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, दुग्ध विकास आयुक्त प्रशांत मोहोड, पणन संचालक संजय कदम, तसेच विविध सहकारी संस्था बँक यांचे पदाधिकारी यांचा समावेश आहे. यामध्ये राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकारी साखर कारखाना संघ व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, राज्य हाऊसिंग फेडरेशन अध्यक्ष सुहास पटवर्धन, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशन अध्यक्ष सीताराम राणे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांचा समावेश करण्यात आला आहे.

माजी सहकार आयुक्त मधुकर चौधरी, माजी अपर सहकार आयुक्त दिनेश औउळकर, एस. बी. पाटील, कोकण विभागीय सहनिबंधक मिलिंद भालेराव, अपर निबंधक राजेश सुरवसे यांचा समावेश आहे. सहकार क्षेत्रासमोरील विविध आव्हाने लक्षात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी नव्याने समिती तयार करण्यात आली आहे.



# विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेच्या वतीने संस्थांना आर्थिक निधी प्रदान

नागपूर – सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम ठेवत विविध संस्थांना केलेली मदत मोलाची असून त्याग आणि समर्पणाच्या भावनेतूनच या संस्थेचा पाया रचला गेल्याने या संस्थेवर जनमानसाचा दृढ विश्वास आहे, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ सहप्रांतप्रचारक परीक्षित जावडे यांनी संगितले.

येथील विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेच्या वतीने विविध संस्थांना आर्थिक निधी प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर रा. स्व. संघाचे विदर्भ सहप्रांतप्रचारक परीक्षित जावडे पतसंस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे, उपाध्यक्ष महेश अंधारे होते. डॉ. हेडगेवार स्मारक समिती – १ लाख, विद्या भारती, विदर्भ – १ लाख, संस्कृत भारती, विदर्भ – १ लाख, मिशन विश्व ममत्व फाऊंडेशन –१ लाख या संस्थांना हा सेवा निधी प्रदान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष जुगादे यांनी प्रास्ताविकात सेवानिधी बाबतची भूमिका विशद केली. संस्थेची वार्षिक उलाढाल १७० कोटींपेक्षा अधिक असून संस्थेचा नफा दरवर्षी २ कोटींपेक्षा अधिक आहे. संस्थेला ५६ वर्षांपासून ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त होत आहे.

सूत्रसंचालन सारिका ठाकरे तर आभार उपाध्यक्ष अंधारे यांनी मानले विलास पुजारी यांच्या पसायदानाने सांगता झाली. रा. स्व. संघ विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे, डॉ. मंजूषा गिरी, श्रीनिवास वर्णेकर, शैलेश जोशी, निलिमा बावणे, विवेक सोनटक्के यांच्यासह संस्थेचे संचालक कल्याण दिवाण, श्रीकांत आगलावे, मधु गौर, विवेक धाक्रस, माधुरी इंदुरकर, राहुल वेलंकीवार उपस्थित होते.




# वर्धा जिल्हा सहकार भारतीची नवीन कार्यकारिणी जाहीर

वर्धा – सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी सजग राहून समप्रित भावनेने विकाससाठी कार्यरत राहावे, अशी अपेक्षा सहकार भारतीचे प्रदेश सचिव विनोद भीमनवार यांनी सांगितले. वाशिम जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांची बैठक येथे झाली. यावेळी जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाध्यक्षपदी प्रकाश बागडे, महामंत्रिपदी आशिष तांबोळकर यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष अरुण खंडागळे, कांतीलाल बरडिया, सचिव गजानन जाधव, खजिनदार ब्रिजमोहन मालपाणी, संघटन प्रमुख तुळशीराम निकम, सहसंघटन प्रमुख हेमंत जोशी आदी पदाधिकारी जाहीर करण्यात आले. विश्वनाथ राऊत यांनी आभार मानले.

# समृद्धी सहकारी पतसंस्थेला जिल्हास्तरीय आदर्श सहकारी पतसंस्था पुरस्कार प्रदान

**वाशिम –** येथील समृद्धी सहकारी पतसंस्थेला यंदाचा जिल्हास्तरीय आदर्श सहकारी पतसंस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

आमदार सई डहाके यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बागडे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. विदर्भ महासंघाचे अध्यक्ष दिलीप राजूरकर आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# नागरी सहकारी बँका
# प्रशासकीय ‘व्यावसायिकता’ आणि अस्तित्वाचा संघर्ष

नागरी सहकारी बँका हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि सामान्य मध्यम वर्गीयांच्या विश्वासाचा कणा आहेत. मात्र, बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेत केवळ ‘सहकार’ हा शब्द आता पुरेसा उरलेला नाही. ‘सहकार’ या पवित्र शब्दाआड चाललेल्या राजकीय हस्तक्षेपामुळे आणि तांत्रिक बँकिंग ज्ञानाच्या अभावामुळे अनेक बँका डबघाईला आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, भारतीय रिझर्व्ह बँकेने मागील काही वर्षात अनेक धोरणात्मक करून या क्षेत्रात ‘व्यावसायिक क्रांती’ आणली आहे.

**※ बँकिंग नियमन कायदा, १९४९ : कलम १०–ए आणि कार्यकाळाच्या कठोर तरतुदी –**

या कलमातील तरतुदी बँकांच्या संचालक मंडळाच्या रचनेबाबत आणि त्यांच्या कार्यकाळाबाबत अत्यंत स्पष्ट व बंधनकारक आहेत.

**विशेष ज्ञानाची आवश्यकता (कलम १०–ए (२) (अ))** – कायद्यानुसार, बँकेच्या संचालक मंडळातील किमान ५१% सदस्यांकडे बँकिंग, लेखाशास्त्र, अर्थशास्त्र, वित्त, कायदा, कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किंवा रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या अन्य कोणत्याही विषयाचे तांत्रिक ज्ञान किंवा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणे अनिवार्य आहे. यामुळे बँकेचा कारभार तज्ज्ञांच्या हाती राहण्यास मदत होईल.




**गणेश निमकर**
**९८२२५ ६८५५०**


**व्यावसायिक निष्पक्षता (कलम १०–ए (२) (ब))** – संचालकाचा बँकेशी कोणताही ‘मोठा वैयक्तिक रस’ नसावा. हे कलम ‘हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**१० वर्षांची कार्यकाळ मर्यादा** (Tenure Limit) – कलम १०–एच्या तरतुदींनुसार, कोणत्याही संचालकाला (अध्यक्ष सोडून, ज्यांच्यासाठी ५+५ वर्षांचे वेगळे निकष आहेत.) सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहता येणार नाही. १० वर्षे पूर्ण होताच संबंधित संचालकाचा कार्यकाळ कायद्याने संपुष्टात येतो. यात कोणत्याही ‘विश्रांती काळाची’ (Cooling-off Period) सवलत नसल्याने, १० वर्षे पूर्ण केलेल्या संचालकाला अनिवार्यपणे पद सोडावे लागते. सत्तेचे केंद्रीकरण रोखून नवीन नेतृत्वाला संधी मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

**आरबीआयचे अधिकार (कलम १०–ए (५))** – जर एखादी बँक किंवा तिचे संचालक मंडळ वरील तरतुदींचे (पात्रता किंवा कार्यकाळ) पालन करत नसेल, तर रिझर्व्ह बँकेला अत्यंत व्यापक अधिकार आहेत. आरबीआय संबंधित संचालकांना लेखी आदेशाद्वारे तात्काळ पदावरून दूर करू शकते. इतकेच नव्हे तर, त्या रिक्त जागी नवीन पात्र संचालकाची नियुक्ती करण्याचा कायदेशीर अधिकारही रिझर्व्ह बँकेकडे आहे. बँकेने स्वतःहून कारवाई न केल्यास आरबीआय या कलमाचा वापर करून प्रशासकीय शिस्त आणते.

**※ कोल्हापूर खंडपीठाचा ऐतिहासिक निकाल : कायदेशीर वास्तवाची जाणीव –**

रिझर्व्ह बँकेने संचालकांच्या कार्यकाळावर (१० वर्षे) जे निर्बंध घातले, त्याला 'कोल्हापूर जिल्हा अर्बन बँक्स को–ऑपरेटिव्ह असोसिएशन लिमिटेड'ने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात आव्हान दिले होते.

न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित बी. कढेठाणकर यांच्या खंडपीठाने या प्रकरणात अंतरिम दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, रिझर्व्ह बँकेने केवळ सुधारित कायद्याची (Banking Regulation Amendment Act) अंमलबजावणी केली आहे. ज्या संचालकांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर सलग १० वर्षे पूर्ण केली आहेत, ते आता पदावर राहण्यास अपात्र ठरतात. सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी आणि संस्थात्मक सुशासनासाठी (Governance) हा बदल अनिवार्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

**※ कलकत्ता उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण संदर्भ –**

सहकारी बँकांच्या प्रशासकीय सुधारणांच्या बाबतीत कलकत्ता उच्च न्यायालयाने देखील अशाच प्रकारच्या वादात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

कलकत्ता उच्च न्यायालयाने आपल्या विविध निकालांमध्ये हे स्पष्ट केले आहे की. सहकारी संस्था जरी राज्याच्या अखत्यारीत असल्या (State Subject), तरी ‘बँकिंग’ हा विषय केंद्र सरकारच्या आणि पर्यायाने रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येतो.

न्यायालयाने नमूद केले की, जेव्हा प्रश्न ‘बँकिंग व्यवसाया’च्या शिस्तीचा आणि ठेवीदारांच्या हिताचा असतो, तेव्हा रिझर्व्ह बँकेने केलेले नियम आणि बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदी या सहकारी संस्था कायद्यापेक्षा वरचढ ठरतात.

कलकत्ता उच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे आरबीआयला बँकिंग नियमन कायद्याच्या कलम १०–ए अंतर्गत संचालकांना हटवण्याचे जे अधिकार मिळाले आहेत, त्यांना मोठी कायदेशीर ताकद मिळाली आहे. कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाला या व्यापक कायदेशीर संदर्भाचा भक्कम आधार आहे.

**※ नेतृत्व बदलाचे कठोर निकष : १०, १५ आणि ७० चे गणित –**

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांमधील सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी आणि व्यावसायिकता वाढवण्यासाठी वयोमर्यादा व कार्यकाळाबाबत अत्यंत कडक विभागणी केली आहे. हे नियम केवळ मार्गदर्शक नसून बँकिंग नियमन कायद्याच्या चौकटीत अनिवार्य आहेत.

**※ नागरी सहकारी बँकांचे नवे पर्व : संचालकांच्या १० वर्षांच्या सत्तेला ‘कायदेशीर’ पूर्णविराम –**

नागरी सहकारी बँकांमधील प्रशासकीय पारदर्शकता आणि व्यावसायिकता वाढवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. या नवीन निर्देशानुसार, कोणताही संचालक एकाच बँकेत सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही; ही आता केवळ मार्गदर्शक सूचना नसून एक अनिवार्य कायदेशीर अट आहे. १० वर्षांचा हा कार्यकाळ पूर्ण होताच, संबंधित संचालकाला कोणत्याही सबबीशिवाय तात्काळ पद सोडावे लागेल, अन्यथा आर.बी.आय. बँकिंग नियमन कायद्याच्या कलम १०–ए नुसार थेट बडतर्फीची कारवाई करू शकते. सर्वात महत्त्वाची आणि वास्तववादी तरतूद म्हणजे, एकदा १० वर्षांची मर्यादा संपली की, अशा संचालकांसाठी पुन्हा त्याच बँकेत निवडून येण्यासाठी कोणताही ‘कूलिंग पीरियड’ (विश्रांती काळ) उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

याचा अर्थ असा की, १० वर्षे पूर्ण केलेल्या संचालकाचे त्या बँकेतील प्रशासकीय आस्तित्त्व कायमस्वरूपी संपुष्टात येते. वर्षानुवर्षे एकाच पदावर

**पुढील पानावर...**

**मागील पानावरून...** राहून निर्माण झालेली 'सत्ताकेंद्रे' मोडीत काढण्यासाठी आणि नवीन, सुशिक्षित नेतृत्वाला संधी देण्यासाठी आरबीआयने उचललेले हे पाऊल सहकार क्षेत्रासाठी एक 'व्यावसायिक संजीवनी' ठरणार आहे.

**※ बँकिंग नेतृत्व आणि स्थैर्यासाठी '१५ आणि ७०' चे कठोर समीकरण: 'कूलिंग-ऑफ'चे महत्त्व –**

नागरी सहकारी बँकांमधील कार्यकारी नेतृत्वात व्यावसायिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेने मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा कार्यकारी संचालक पदांसाठी 'दुहेरी मर्यादा' निश्चित केली आहे. या नियमानुसार, कोणतीही व्यक्ती एकाच बँकेत सलग १५ वर्षांपेक्षा जास्त काळ या पदांवर राहू शकत नाही; १५ वर्षे पूर्ण होताच त्यांना अनिवार्यपणे निवृत्त व्हावे लागेल. यासोबतच, आरबीआयने ७० वर्षाची 'लक्ष्मणरेषा' आखली असून, हे वय ओलांडलेल्या व्यक्तीला या पदावर राहता येणार नाही. विशेष म्हणजे, १५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच जर संबंधित अधिकाऱ्याचे वय ७० झाले, तर त्यांना त्याच क्षणी पदमुक्त व्हावे लागेल.

या प्रक्रियेत सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि जुन्या नेतृत्वाचा प्रभाव पूर्णपणे संपुष्टात यावा यासाठी ३ वर्षांचा 'विश्रांती काळ' (Cooling-off Period) अनिवार्य करण्यात आला आहे. १५ वर्षांची सेवा बजावल्यानंतर संबंधित व्यक्तीला त्याच बँकेत पुन्हा कोणत्याही पदावर नियुक्ती मिळवण्यासाठी किमान ३ वर्षे वाट पाहावी लागेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या ३ वर्षाच्या विश्रांती काळात त्या व्यक्तीचा बँकेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध असता कामा नये. याचा अर्थः

ती व्यक्ती बँकेत सल्लागार (Consultant) म्हणून काम करू शकत नाही.

बँकेच्या कोणत्याही धोरणात्मक निर्णयात त्यांचा सहभाग चालणार नाही.

बँकेच्या कोणत्याही समितीवर (Committee) सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती करता येणार नाही.

बँकेच्या मालमत्तेचा, गाडीचा किंवा इतर सुविधांचा वापर त्यांना करता येणार नाही.

**उदाहरण** : समजा, 'क्ष' हे एका सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून वयाच्या ६५ व्या वर्षी १५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून निवृत्त झाले. नियमानुसार, त्यांना पुन्हा त्याच बँकेत अध्यक्ष किंवा संचालक म्हणून यायचे असेल, तर वयाची ६८ वर्षे पूर्ण होईपर्यंत (पुढील ३ वर्षे) त्यांना बँकेच्या कामकाजापासून पूर्णपणे अलिप्त राहावे लागेल. या काळात त्यांनी बँकेचे 'पेड सल्लागार' म्हणूनही काम करणे बेकायदेशीर ठरेल. ही ३ वर्षाची 'क्लीन ब्रेक' मर्यादा यासाठी आहे जेणेकरून नवीन नेतृत्वाला कोणत्याही दबावाशिवाय स्वतंत्रपणे काम करता येईल.

नेतृत्व बदलाचा हा सक्तीचा नियम बँकांना 'व्यक्ती-केंद्रित' होण्यापासून वाचवून 'संस्था-केंद्रित करण्यासाठी उचललेले एक क्रांतिकारी पाऊल आहे.

**※ १ ऑगस्ट २०२५ ची 'कट-ऑफ' तारीख –**

ज्या संचालकांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी आपला विहित कार्यकाळ (१० किंवा १५ वर्षे) पूर्ण केला आहे, त्यांना नवीन निर्देशांनुसार तात्काळ पद सोडावे लागेल. कोल्हापूर खंडपीठाने याच मुद्द्यावर शिक्कामोर्तब करताना सांगितले की, हा नियम पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू आहे आणि तो पाळणे अनिवार्य आहे.

हे १०, १५ आणि ७० चे गणित केवळ आकडेमोड नाही, तर तो 'पिढीजात वर्चस्व' संपवण्याचा आरबीआयचा एक मास्टरप्लॅन आहे. यामुळे बँकांचे बोर्ड आता 'अति-ज्येष्ठ नागरिक केंद्र'सारखे न राहता, तरुण आणि तडफदार व्यावसायिक ज्ञानाचे केंद्र बनेल. अनुभवी लोकांच्या मार्गदर्शनाची गरज आहेच, पण अंमलबजावणीसाठी सक्रिय आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम नेतृत्वाची गरज आहे, हेच या नियमांचे मूळ आहे.

**※ ५१% व्यावसायिक संचालक : बोर्डाचे 'कॉर्पोरेट' स्वरूप –**

बँकिंग नियमन कायदा, १९४९ चे कलम १०-ए आता नागरी सहकारी बँकांसाठी निव्वळ मार्गदर्शक सूचना राहिलेली नाही, तर ती एक अनिवार्य अट झाली आहे. बँकांचे संचालक मंडळ (Board of Directors) हे केवळ सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचे साधन न राहता, ते तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे हा या बदलाचा मुख्य उद्देश आहे.

**※ व्यावसायिक पात्रतेचे निकष** (Professional Qualifications)**:**

कलम १०-ए (२) (अ) नुसार, संचालक मंडळातील एकूण सदस्यांपैकी किमान ५१% संचालक खालील क्षेत्रांतील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेले असणे बंधनकारक आहे:

**१. बँकिंग** (Banking) **:** व्यावसायिक बँका किंवा वित्तीय संस्थांमधील कामाचा अनुभव.

२. **लेखाशास्त्र** (Accountancy) **:** सनदी लेखापाल (CA) किंवा खर्च लेखापाल (ICWA).

**३. अर्थशास्त्र आणि वित्त** (Economics Finance) **:** आर्थिक धोरणे आणि भांडवली बाजाराची जाण.

**४. कायदा** (Law) **:** कायदेशीर बाबी आणि बँकिंग कायद्यांचे ज्ञान असलेले वकील.

**५. कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था** (Agriculture Rural Economy) **:** ग्रामीण कर्जपुरवठा आणि शेतीविषयक अर्थकारणाची समज.

**६. माहिती तंत्रज्ञान** (IT) **आणि सायबर सुरक्षा** : डिजिटल बँकिंगच्या युगात आयटी तज्ज्ञांचा समावेश आता अनिवार्य झाला आहे.

**※ तांत्रिक दृष्टीकोनाची गरज** (The Need for Expertise) **:**

– बँकिंग आता पूर्वीसारखे केवळ 'खाते उघडणे आणि पैसे देणे' इतपत मर्यादित राहिलेले नाही. बोर्डाकडे तांत्रिक दृष्टी असणे खालील कारणांसाठी आवश्यक आहे.

– हॅकर्स आणि सायबर फसवणुकीच्या धोक्यांपासून बँकेचे आणि ठेवीदारांचे संरक्षण करण्यासाठी बोर्डाला तांत्रिक बाबी समजणे गरजेचे आहे.

– कर्ज वाटप करताना केवळ 'ओळख' न पाहता, कर्जदाराची परतफेड क्षमता आणि ताळेबंदातील जोखीम ओळखण्यासाठी तज्ज्ञ संचालकांची मदत होते.

रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे काटेकोर पालन (Compliance) करणे सोपे होईल.

**※ व्यावसायिक निष्पक्षता** (Professional Integrity) –

कलम १०-ए (२) (ब) नुसार, या व्यावसायिक संचालकांचे बँकेत कोणतेही 'मोठे वैयक्तिक हित' (Substantial Interest) नसावे. जेणेकरून बँकेचे निर्णय घेताना कोणताही वैयक्तिक स्वार्थ आड येणार नाही.

**※ अंमलबजावणी न झाल्यास आरबीआयचे 'ब्रह्मास्त्र' –**

जर एखाद्या बँकेने ५१% व्यावसायिक संचालकांचा कोटा पूर्ण केला नाही, तर कलम १०-ए (५) नुसार रिझर्व्ह बँकेला खालील अधिकार आहेत.

१. पात्र नसलेल्या संचालकांना तात्काळ पदावरून दूर करणे.

२. त्यांच्या जागी रिझर्व्ह बँकेने सुचवलेल्या पात्र तज्ज्ञाची नियुक्ती करणे.

३. हे आदेश न पाळल्यास बँकेवर मोठा आर्थिक दंड आकारणे किंवा बँकेचा परवाना धोक्यात येणे.

थोडक्यात सांगायचे तर, आता बोर्डावर 'होयबा' (Yes-men) चालणार नाहीत. बँकेचा ताळेबंद वाचता येणारा, सायबर धोके ओळखणारा आणि कायद्याची चौकट समजणारा 'प्रोफेशनल' चेहराच आता बँकेचे भविष्य ठरवेल. ज्या बँका केवळ नावापुरते संचालक नेमतील, त्यांना आरबीआयच्या कठोर तपासणीला सामोरे जावे लागेल.

**※ १० डिसेंबर २०२५ ची नियमावली आणि 'लॉटरी' पद्धत** (Drawing

of Lots) –

केंद्र सरकारने १० डिसेंबर २०२५ रोजी 'बँकिंग नियमन (सहकारी संस्था) सुधारणा नियम, २०२५' अधिसूचित करून नागरी सहकारी बँकांच्या प्रशासकीय प्रक्रियेत एक ऐतिहासिक बदल घडवून आणला आहे. हा बदल प्रामुख्याने ज्या बँकांमध्ये 'अपात्र संचालकां'ची संख्या मोठी आहे, त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

केंद्र सरकारने १० डिसेंबर २०२५ रोजी अधिसूचित केलेल्या 'बँकिंग नियमन (सहकारी संस्था) सुधारणा नियम, २०२५' मधील नियम ५-अ (Drawing of Lots) ही तरतूद नागरी सहकारी बँकांमधील प्रस्थापित सत्ताकेंद्रे मोडीत काढण्यासाठी अत्यंत प्रभावी शस्त्र ठरली आहे. अनेकदा बँकेच्या संचालक मंडळावर असे अनेक सदस्य असतात जे बँकिंग नियमन कायद्याच्या कलम १०-ए नुसार तांत्रिक पात्रता पूर्ण करत नाहीत किंवा ज्यांचा १० वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे; अशा वेळी, कोणाला पदावरून दूर करायचे यावरून बोर्डामध्ये अंतर्गत वाद, गटबाजी किंवा राजकीय दबाव निर्माण होण्याची दाट शक्यता असते. या वादावर कायमस्वरूपी आणि निष्पक्ष उपाय म्हणून 'चिठ्ठ्या टाकून' (Drawing of Lots) निर्णय घेण्याची पद्धत आता अनिवार्य केली आहे.




ही केवळ साधी लॉटरी नसून, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रतिनिधींच्या थेट उपस्थितीत पार पडणारी एक कायदेशीर आणि पारदर्शक प्रक्रिया आहे, जी राजकीय वशिलेबाजीला पूर्णविराम देते.

ज्या संचालकाच्या नावाची चिठ्ठी या प्रक्रियेत निघेल, त्याला कोणत्याही वादाविना आणि मान-अपमानाची तमा न बाळगता तात्काळ पद सोडावे लागेल, ज्यामुळे बँकेतील वर्षानुवर्षे टिकून असलेले 'येस बॉस' कल्चर आणि 'पॉवर सेंटर्स' उध्वस्त होण्यास मदत होईल. ही पद्धत स्पष्टपणे अधोरेखित करते की, आता बँकेचे भवितव्य कोणाच्या 'राजकीय शब्दावर' किंवा 'वजनावर' नव्हे, तर केवळ 'कायद्याच्या नियमावर' ठरेल.

आरबीआयने बँकांचे 'बँकिंग' आणि 'राजकारण' वेगळे करण्यासाठी दोन स्वतंत्र स्तरावरील प्रशासन व्यवस्था उभारली आहेः

❊ **व्यवस्थापन मंडळ** (Board of Management - BoM) –

नागरी सहकारी बँकांमधील व्यावसायिकता आणि ताळेबंदाची सुरक्षितता जपण्यासाठी 'व्यवस्थापन मंडळ' (BoM) हे आता एक अनिवार्य कवच ठरले आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, ज्या बँकांच्या एकूण ठेवी १०० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त आहेत, त्यांच्यासाठी व्यवस्थापन मंडळाची स्थापना करणे बंधनकारक आहे. या नवीन प्रशासकीय रचनेत अधिकार आणि जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी करण्यात आली असून, मूळ संचालक मंडळ केवळ व्यापक धोरणात्मक निर्णय घेईल, तर प्रत्यक्ष बँकिंग कार्यावर-जसे की कर्ज मंजुरी, निधी व्यवस्थापन आणि कर्ज वसुली- तांत्रिक नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पूर्णतः व्यवस्थापन मंडळाकडे असेल. विशेष म्हणजे, या मंडळात बँकिंग, वित्त, लेखाशास्त्र किंवा कायद्यातील निष्णात तज्ज्ञांचा सहभाग असणे आवश्यक आहे, ज्यामुळे व्यावसायिक निर्णय प्रक्रियेला बळकटी मिळते. सत्तेचे योग्य संतुलन (Checks and Balances) राखण्यासाठी आरबीआयने असा कठोर नियम घातला आहे की, बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष हे व्यवस्थापन मंडळाचे (BoM) अध्यक्ष असू शकत नाहीत, जेणेकरून बँकेचा दैनंदिन कारभार कोणत्याही राजकीय किंवा वैयक्तिक प्रभावापासून मुक्त राहून केवळ व्यावसायिक निकषांवर चालेल.

❊ **मुख्य जोखीम अधिकारी** (Cheif Risk Officer - CRO) –

नागरी सहकारी बँकांमधील आर्थिक स्थैर्य आणि जोखीम व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने 'मुख्य जोखीम अधिकारी' (Chief Risk Officer - CRO) हे पद अत्यंत शक्तिशाली आणि स्वतंत्र केले आहे. या पदाची निष्पक्षता जपण्यासाठी आरबीआयने 'ड्युअल हॅटिंग'वर (दुहेरी भूमिका) पूर्णपणे बंदी घातली आहे, याचा अर्थ असा की, CRO बँकेचा कोणताही व्यावसायिक विभाग सांभाळू शकणार नाही किंवा त्याला कर्ज वाटपाचे कोणतेही 'टार्गेट' दिले जाणार नाही, ज्यामुळे तो कोणत्याही दबावाशिवाय निर्णय घेऊ शकेल. विशेष म्हणजे, मुख्य जोखीम अधिकाऱ्याला एक प्रकारचा 'नकाराधिकार' (Veto Power) देण्यात आला असून, त्याचे मुख्य काम बँकेसमोर येणारी संभाव्य जोखीम ओळखणे आणि ती रोखणे हे आहे. तो थेट संचालक मंडळाला) रिपोर्ट करेल आणि सीईओ किंवा इतर कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रभाव त्याच्यावर असणार नाही. थोडक्यात, बँकेची आर्थिक सुरक्षितता आणि ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तो एक निष्पक्ष आणि 'स्वतंत्र पहारेकरी' म्हणून कार्य करेल.

कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रभाव त्याच्यावर असणार नाही. थोडक्यात, बँकेची आर्थिक सुरक्षितता आणि ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तो एक निष्पक्ष आणि 'स्वतंत्र पहारेकरी' म्हणून कार्य करेल.

सदर लेखात दिलेली माहिती ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २८ नोव्हेंबर २०२५च्या अधिसूचना आणि १० डिसेंबर २०२५च्या केंद्र सरकारच्या सुधारित नियमावलीचे 'स्वैर भाषांतर' व विश्लेषण आहे. बँकिंग नियम हे अत्यंत तांत्रिक आणि कायदेशीर गुंतागुंतीचे असतात. त्यामुळे, कोणतीही कायदेशीर कार्यवाही करण्यापूर्वी किंवा धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील 'मूळ नियम' (Original Rules/Master Directions) वाचणे आणि कायदेशीर सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे.

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी आता मैदानातील नियम पूर्णपणे बदलले आहेत. रिझर्व्ह बँक (RBI) आता केवळ मार्गदर्शक राहिलेली नाही, तर ती एका कडक 'अंपायर'च्या भूमिकेत आली आहे आणि 'थर्ड अंपायर' म्हणून न्यायालयही (कोल्हापूर व कलकत्ता खंडपीठ) नियमांवर बोट ठेवून आरबीआयच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करत आहे. अशा वेळी जुन्या पद्धतीचे 'बॅटिंग' किंवा वशिलेबाजीचे राजकारण आता बँका वाचवू शकणार नाही.

संचालकांसाठीची '१० वर्षाची मुदत' आणि पारदर्शकतेसाठीची 'लॉटरी पद्धत' ही सहकारी क्षेत्रासाठी एक कटू औषध मात्रा वाटू शकते, मात्र बँकांच्या दीर्घायुष्यासाठी आणि सामान्य ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी तीच एकमेव 'संजीवनी' आहे.

ज्या बँका हे बदल स्वीकारून व्यावसायिकतेची कास धरतील, त्या 'सहकारी' ते 'कॉपरेट' असा यशस्वी प्रवास करून आधुनिक स्पर्धेत टिकून राहतील. याउलट, जे जुन्याच चौकटीत अडकून राहतील आणि सुधारणांना विरोध करतील, त्या बँका केवळ इतिहासात जमा होण्याची भीती आहे. अखेर, बदल हाच शाश्वत नियम आहे. त्यामुळे प्रश्न हा नाही की आरबीआयने नियम का बदलले?, तर खरा प्रश्न हा आहे की बँकेच्या अस्तित्त्वासाठी तुम्ही स्वतःला बदलायला तयार आहात का?

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल –** nimkarganeshgmail.com ❊❊❊❊

# मच्छिमारांसाठी व मासेमारीशी निगडीत शेती व्यवसाय करण्याकरिता 'नि:शुल्क समूह अपघात विमा योजना (GAIS)'

मच्छिमारांसाठी व मासेमारीशी निगडीत शेती व्यवसाय करण्याकरीता 'नि:शुल्क समूह अपघात विमा योजना (GAIS)'

भारतातील मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील शाश्वत आणि जबाबदार विकासाद्वारे नीलक्रांती घडवून आणण्यासाठी भारत सरकारने मत्स्य संपदा (PMMSY) योजनेला पाच वर्षांच्या कालावधीसाठी एकूण २०,०५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर मान्यता दिली आहे. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये (UT). मत्स्यव्यवसाय क्षेत्र प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे देशातील सुमारे २८ दशलक्ष मच्छिमारांच्या रोजी रोटीला आधार देत आहे.

अशा मच्छिमारांचा विमा हा PMMSY च्या मार्गदर्शक तत्त्वांच्या परिशिष्ट- II च्या क्र.१४.१ मधील लाभार्थी-केंद्रित केंद्र प्रायोजित योजनेअंतर्गत मच्छिमारांमध्ये मत्स्य कामगार, मत्स्यपालक आणि मासेमारी आणि मत्स्यपालन-संबंधित संलग्न क्रियाकलापांमध्ये थेट सहभागी असलेल्या इतर कोणत्याही श्रेणीतील व्यक्तींचा समावेश होतो. या योजनेअंतर्गत, १८ ते ७० वर्षे वयोगटातील पुरुष किंवा महिला मच्छिमार खालीलप्रमाणे विमा संरक्षणासाठी पात्र असतील.

१) रु.५.०० लाख मृत्यू किंवा कायमस्वरुपी अपंगत्व

२) रु.२.५० लाख कायमस्वरुपी आंशिक अपंगत्वासाठी

३) रु. २५०००/- अपघाती हॉस्पिटलायझेशन करिता

**अंमलबजावणीसाठी पद्धती :** नॅशनल फिशरीज डेव्हलपमेंट बोर्ड ही (NFDB) ही समूह अपघात विमा योजना (GAIS) लागू करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आली आहे. मेसर्स ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (OICL) मार्फत मच्छिमारांच्या विमा संरक्षणासाठी मध्यस्थ म्हणून GAIS साठी दाव्यांचे व्यवस्थापन Providence India Insurance Broking Pvt. Ltd. द्वारे केले जाते.

राज्ये/केंद्रशासित प्रदेश सध्याच्या वर्षासाठी विमा उतरवल्या जाणाऱ्या मच्छिमारांची ओळख करतील आणि NFDB द्वारे प्रदान केलेल्या विहित नमुन्यात यादी करतील आणि विमा विभागात डेटाबेस राखण्यासाठी तपशील प्रदान करतील. विमा दाव्यांच्या प्रक्रियेसाठी, राज्य/केंद्रशासित प्रदेश जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालय दावेदारांकडून कागदपत्रे गोळा करेल आणि मेसर्स OICL द्वारे दाव्याची पुढील प्रक्रिया आणि निपटारा करण्यासाठी योग्य चॅनेलद्वारे विमा सेल, NFDB कडे पाठवेल.

**विमा कंपनी (मेसर्स द ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड)** – विमा कंपनी पॉलिसी कागदपत्रे आणि प्रिमियम पावत्या तयार करते. विमा कंपनीकडून प्रीमियम प्राप्त झाल्यापासून प्रस्तावित मच्छिमारांसाठी अपघाती जोखीम कव्हर केली जाते. विमा कंपनी दाव्याची माहिती, दाव्याची कागदपत्रे, दाव्याची पडताळणी आणि मंजूरी स्वीकारते. दाव्यांचे संपूर्ण दस्तऐवज प्राप्त केल्यानंतर ते दावेदार/नामनिर्देशित/कायदेशीर वारस यांच्या बचत खात्यात डीबीटीद्वारे जमा करुन दावा निकाली काढतील.

**विमा मध्यस्थ (M/s. Providence India Insurance Broking Pvt. Ltd.) -** इन्शुरन्स मध्यस्थ प्री-प्लेसमेंट, प्लेसमेंट, पोस्ट प्लेसमेंट सेवा जसे की इनव्होईरींग, अंडररायटिंग, पॉलिसी जनरेशन, वाटप आणि प्लेसमेंट, त्यानंतरच्या एंडोर्समेंट माहिती, प्रक्रिया आणि दाव्यांची पूर्तता, निराकरण, हँडलिंग यासारख्या सेवांमध्ये त्वरित आणि प्रभावी सेवा प्रदान करेल.

| पॉलिसी प्रकार | वर्णन | कव्हरेज | प्रिमीयम |
|---|---|---|---|
| पॉलिसी-१ | गट जनता वैयक्तिक अपघात धोरण (GJPA) ज्यात मृत्यू आणि कायमस्वरुपी एकूण अपंगत्व (PTD) समाविष्ट आहे आणि सीएसआय रु. ५ लाख | मृत्यू 100% CSI<br>PTD 100 % CST | रु. ६८.४४/-<br>(जीएसटी लागू नाही) |
| पॉलिसी-२ | कायम स्वरूपी आशिक अपंगत्व (PPD) आणि हॉस्पिटलायझेशन कव्हर करणारे विशेष आकस्मिक धोरण | PPD<br>रु.२,५०,०००/-<br>पर्यंत हॉस्पिटलायझेशन<br>रु.२५,०००/- | रु. ४.००/-<br>(जीएसटीसह) |
| | **एकूण** | | **रु. ७२.४४/-** |

*The premium break up details for Central and State share per annum are mentioned below:

| S. No. | Sharing Pattern | Type of Policy | State/ UT Share Rs. | Centre Share Rs. | Total Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **60:40 between the Centre and General State Government** | GJPA | 27.38 | 41.06 | 68.44 |
| | | i.Special Contingency Policy | 1.60 | 2.40 | 4.00 |
| | | **Total** | **28.98** | **43.46** | **72.44** |
| 2 | **90:10 between the Central and North Estern and Himalayan States** | i.GJPA | 6.84 | 61.60 | 68.44 |
| | | ii.Special Contingency Policy | 0.40 | 3.60 | 4.0 |
| | | **Total** | **7.24** | **65.20** | **72.44** |
| 3 | **For UTs** | i.GJPA | - | 68.44 | 68.44 |
| | | ii. Special Contingency Policy | - | 4.00 | 4.00 |
| | | **Total** | **0.00** | **72.44** | **72.44** |

पुढील पानावर...

## 'सहकार स्वरूपा' - ॲड. दीपक पटवर्धन यांची यशस्वी कारकीर्द

विविध राज्यात तसेच जगाच्या काही देशांमध्ये विस्तारलेल्या सहकार क्षेत्रात मुख्य म्हणजे ग्रामीण भागाची अर्थवाहिनी म्हणून एखादी संस्था उभी करणे, ती वाढविणे, हे अवघड आहे पण विश्वास आणि जिद्द या बळावर उद्दिष्ट साध्य करणे शक्य आहे. तसे पहिले तर साहित्य म्हणजे विविध विषयांचा सुरेख संगम होय. त्यामध्ये देखील एखादा विषय समोर ठेवून त्यावर अनुभवावर आधारित लेखन करणे ही कला आहे. त्याचे प्रतिबिंब या पुस्तकामध्ये दिसून येते.



रत्नागिरी येथील स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांच्या सर्व क्षेत्रांतील मुशाफिरींचे अनुभवकथन या पुस्तकात केले आहे. या क्षेत्रात येणाऱ्या युवकांना अथवा नव्याने संस्था स्थापन करणाऱ्यांना या पुस्तकाचा मार्गदर्शक म्हणून नक्कीच उपयोग होणार आहे. एखादी सहकारी संस्था कशी उभी करायची, त्याची वाढ, विस्तार, ग्राहकाभिमुख सेवा आणि आगामी काळातील उद्दिष्टे या सर्व दृष्टीने पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.

पुस्तकाच्या माध्यमातून सुमारे १२ विषयांची मांडणी करण्यात आली आहे. त्यामध्ये नांदी साफल्याची, स्वरुपानंद उभी राहिली, वसुलीचे धडे, पत्ता बदलला, विस्ताराची खुमखुमी, चौकशा आणि क्लीन चिट, स्वरुपानंद - लोकमान्यता आणि राजमान्यता, फलश्रुती, आनंदाचं चक्रवाढ व्याज, वाचवावं ते वाचनालय, थोडेफार राजकारण, पतसंस्था साफल्याची सूत्र या विषयांचा समावेश आहे. लेखक पटवर्धन यांनी पुस्तक लेखनाची भूमिका मनोगत यामधून वाचकांसमोर मांडली आहे. विविध लेखामध्ये प्रसंगानुरूप छायाचित्रांचा वापर करण्यात आला आहे.

पुस्तकाचे लेखन सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी केले असून संपादन प्रशांत दिक्षित यांनी तर राजहंस प्रकाशनने प्रकाशित केले आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या १८२ असून त्यामध्ये विविध राजकीय नेते तसेच सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ मंडळीचे शुभेच्छा संदेश आहेत. तसेच लेखकाचा परिचय देण्यात आला आहे.

मागील पानावरून...

## मच्छिमारांसाठी व मासेमारीशी निगडीत...

GAIS च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अनिवार्य आणि अत्यावश्यक असलेल्या विमा लोकपाल/ग्राहक मंच आणि अशा इतर सेवांसह तक्रारी, न भरलेले आणि कमी पगाराचे दावे लढवणे.

**विमा सेल -** हैदराबाद येथे विमा सेल स्थापन करण्यात आला आहे. ज्यामध्ये दाव्यांची सुरळीत प्रक्रिया करणे, गट अपघात विमा योजना (GAIS) च्या अंमलबजावणीवर देखरेख करणे, विविध भागधारकांशी संपर्क साधणे आणि तक्रारींचे निराकरण करणे यासाठी NFBD, विमा मध्यस्थ आणि विमा कंपनीचे अधिकारी यांचा समावेश आहे.

**विमा प्रीमियम -** PMMSY च्या फंडिंग पॅटर्ननुसार प्रीमियमची संपूर्ण रक्कम केंद्र आणि राज्य यांच्यात सामायिक खर्च केली जाईल. या योजनेत लाभार्थी योगदानाची तरतूद केलेली नाही. ही योजना मेसर्स ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड (OICL) मार्फत राबविण्यात येत आहे. GAIS साठी वार्षिक प्रीमियमचा दर खाली दिलेला आहे.

सदर विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास विहित नमुन्यात दरवर्षी माहिती सादर करणे आवश्यक आहे. विमा दावा सादर करणे तसेच इतर माहिती करिता https://nfdb.gov.in/ welcome/GAIS या संकेतस्थळावर किंवा आपल्या नजिकच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या कार्यालयास भेट द्यावी. केंद्र आणि राज्याच्या वार्षिक भागासाठी प्रीमियम ब्रेकअप तपशील खाली नमूद केला आहे.

(लेखक - सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी, पुणे)


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) - ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे - (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

*** प्रशिक्षण कार्यालय -** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई-मेल : sahakarbharati1416@gmail.com

# ‘सेवक’ श्रेणीचे व्यावसायिक महत्त्व

बँकिंग क्षेत्रात सेवक या श्रेणीमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाचे व्यावसायिक दृष्टीने अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. शाखा, मुख्य कार्यालय, विभागीय कार्यालय, बँकेचे विविध अंतर्गत विभाग असा विस्तार असलेल्या बँकिंग क्षेत्रात सेवक हा बँकेचा शेवटचा परंतु अत्यंत महत्त्वाचा प्रतिनिधी असतो.

सेवक, दप्तरी कॅश प्यून अशा विविध नावाने ओळखले जाणारे या चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्रेणीमध्ये लिफ्टमन ड्रायव्हर आणि अर्धवेळ काम करणारी सफाई कर्मचारी यांचाही समावेश होतो. या श्रेणीतील कर्मचाऱ्यांना आपल्या संस्थेबद्दल आत्यंतिक आदर असतो. संस्थेच्या वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांना ते जवळजवळ देव मानतात. त्यांच्या नजरेत राहण्याचा प्रयत्न करतात, अनेकदा गरज नसतानाही वरिष्ठांची खासगी कामे करण्याची जबाबदारी त्यांनी स्वतःकडे घेतलेली असते असे दिसून येते. या श्रेणीतील कर्मचारी बहुतांशी स्थानिक असतात. शाखा, विभाग किंवा मुख्यालय याठिकाणीच त्यांचे वास्तव्य असते. वास्तव्याच्या अर्थाने ते खऱ्या अर्थाने स्थानिक असतात.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

**※ या स्थानिकत्वाचा बँकेच्या व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असतो.**

ग्रामीण, निमशहरी भागात बँकेचा स्थानिक माणूस गावात राहणे हे गावकऱ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे असते. वेळीअवेळी त्याला भेटून आपल्या बँकेबद्दलच्या शंकांचे निरसन ग्रामीण भागातील मंडळी नि:संकोचपणे यांच्याकडून करत असतात. ग्रामीण भागातील नव्याने येणारे खातेदार सुरुवातीला काउंटरवरील लिपिकाकडे जाण्याऐवजी सेवक श्रेणीतील व्यक्तीशी वार्तालाप करतात, असा अनुभव आहे. हा माणूस त्यांना जवळचा वाटतो. सर्वसाधारणपणे स्थानिक भाषा, स्थानिक बोली यामुळे ही व्यक्ती जवळची वाटत असते.

**※ शाखेच्या व्यवसायवाढीसाठी सेवक श्रेणीतील व्यक्ती फार महत्त्वाच्या असतात.**

त्यांच्या स्थानिकत्व या वैशिष्ट्यामुळे गावातील सर्व आर्थिक व्यवहाराची त्यांना माहिती असते. विशेषतः प्रॉपर्टीची खरेदी विक्री, शेतीची खरेदी विक्री, गावात नव्याने येऊ घातलेली कार्यालये किंवा नवीन आस्थापने याबाबत अधिकृत माहिती त्यांना मिळत असते. या सर्वांचा नवीन खातेदार मिळवण्याच्या दृष्टीने, नवीन कर्जदारांचा शोध घेण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो. दिलेल्या कर्जासाठी किंवा थकित कर्जांसाठी पाठपुरावा करण्यात सेवक वर्गाचा सिंहाचा वाटा असतो. ग्रामीण भागातील वसुली बहुतांशी यांच्यामार्फत येते. थकित खातेदार, त्याचे जामीनदार त्यांच्या निवासस्थानाची माहिती, इतकेच नव्हे तर घरी नसल्यास ही व्यक्ती हमखास कुठे सापडेल, या प्रकारची माहिती ही सेवकवर्गाकडे असते. बँकेचा प्रतिनिधी या नात्याने स्थानिक व्यक्ती त्याच्याशी संपर्क ठेवणे हे प्रतिष्ठेचे लक्षण समजतात. या सर्व पार्श्वभूमीवर सेवक वर्गाला योग्य पद्धतीचे प्रशिक्षण दिल्यास शाखेच्या, बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी त्यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो.

**※ सेवक वर्गाचे प्रशिक्षण –** व्यापारी आणि सरकारी बँकांमध्ये सेवक वर्गाला वर्षातून किमान एक वेळेस प्रशिक्षण देण्याची प्रथा आहे. नागरी सहकारी बँकांतून या श्रेणीतील व्यक्तींना प्रशिक्षण देणे हे अभावाने आढळते. ही स्थिती बदलून या श्रेणीतील व्यक्तींचा बँकेच्या विकासातील हिस्सा वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्यात आले पाहिजे. हे प्रशिक्षण कार्यशाळा या स्वरूपाचे अर्ध्या दिवसाचे असे असावे. या प्रशिक्षणात स्थानिक भाषेमध्ये बँकेच्या प्रॉडक्टची माहिती त्यांना देण्यात यावी. यामध्ये कासाचे (CASA) महत्त्व, मुदतठेवीचा फायदा, त्या मुदतपूर्व मोडता येतात, त्यावर कर्ज मिळते ही माहिती, ठेवींच्या विम्याविषयी माहिती आणि बँकेत ठेव ठेवण्याचे फायदे ही माहिती सोप्या शब्दात दिली जावी.

यासोबतच जी कर्जे आपण देऊ शकतो त्यांच्याबद्दलची जुजबी माहिती देण्यात यावी.

ठेव आणि कर्जांच्या व्यतिरिक्त अन्यसेवा उदाहरणार्थ लॉकर्स, आरटीजीएस, एनईएफटी, चेकचे क्लिअरिंग, रोख विभागातील सर्वसाधारण माहिती देण्यात यावी.

यासोबतच नवीन कर्मचारी वर्गासाठी बँकेच्या स्थापनेपासूनचा इतिहास, बँकेची परंपरा आणि बँक राबवित असलेले सामाजिक उपक्रम, उदाहरणार्थ व्याख्यानमाला, रक्तदान शिबिरे इत्यादी याची माहिती दिली जावी. प्रशिक्षणामध्ये व्यावसायिक प्रशिक्षणाचा एक तास असावा.

**※ व्यावसायिक प्रशिक्षण –** या प्रशिक्षणामध्ये बँकेच्या व्यवहारांची गुप्तता, फिडीलिटी आणि सीक्रसीचा नियम, खातेदारांची माहिती बाहेर न देण्याबाबतचा नियम, हे नियम गांभीर्याने शिकवले जावेत.

सर्वसाधारण फायलिंगचे काम सेवक वर्गाकडे असल्यामुळे फायलिंग कसे करावे, कागदपत्रांचे महत्त्व, विशेषत: कर्जाच्या डॉक्युमेंट्स बाबतचे गांभीर्य याची माहिती दिली जावी. रोख व्यवहाराच्या बाबतीत, रेमीटन्सच्या बाबतीत गुप्तता पाळण्याबद्दल माहिती दिली जावी. बँकेचे लेटरहेड, बँकेचे शिक्के, चेकबुक्स हे सर्व कुलुपात ठेवण्याबद्दलचे नियम सांगण्यात यावेत. बँकेचे उपस्थिती बाबतचे नियम, वेळेत कामावर हजर राहण्याबाबतचे नियम आणि काम संपवूनच परत जाणे, याबाबतचे नियम याची माहिती दिली जावी.

यासोबतच बँकेकडून मिळणारे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फायदे, उदाहरणार्थ सवलतीच्या दरातील कर्जे, गणवेश, सानुग्रह अनुदान, बक्षीस योजना असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. आपल्याला मिळणारा पगार याचा योग्य वापर याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. अतिरिक्त कर्ज घेऊ नयेत हे आवर्जून सांगितले जावे. सेवक वर्गासाठी विशिष्ट शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यावर बढतीची व्यवस्था असावी. पदवीपर्यंतचे शिक्षण, संगणकाबाबतचा बँकेला उपयुक्त असलेला संगणक कोर्स या प्रकारची शैक्षणिक प्रगती सेवक वर्गाने केल्यास त्यांना लिपिक श्रेणीत बढती देण्याबाबत नियोजन असावे.

कार्यालयातील वर्तणुकीबद्दल भाषा खातेदारांशी बोलताना घ्यावयाची काळजी, वरिष्ठांची बोलताना घ्यावयाची काळजी, पेय किंवा खाद्यपदार्थ देताना घ्यावयाची काळजी, या त्यांच्या कामाच्या स्वरूपातील बाबींबाबत आवर्जून सांगण्यात यावे.

सेवक वर्गाला ठराविक अंतराने प्रशिक्षण दिल्यास त्यांच्याकडून बँकेला चांगल्या प्रकारचा व्यवसाय मिळू शकतो, असा अनुभव आहे. बँकिंगमध्ये ज्याला लीड्स असे म्हटले जाते, अशा लीड्स त्यांच्याकडून सहजपणे मिळू शकतात. सेवक वर्गाला दिलेल्या प्रशिक्षणामुळे त्यांचे संस्थेबद्दलचे प्रेम वाढीला लागते आणि संस्थेचे आपल्याकडे लक्ष आहे या जाणिवेमुळे त्यांच्या कामात सकारात्मक बदल होतो. सेवक वर्ग हा नेहमी उभा असतो, त्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण हा अपवादाचा प्रसंग असतो, ज्यात सेवक बसलेले असतात आणि शिकवणारे उभे असतात.

**– डॉ. अभय मंडलिक**

**लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**

*****

# रिझर्व्ह बँक रिपोर्ट : नागरी बँकांची २०२४-२५ची स्थिती

भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकताच २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा ट्रेंड अँड प्रोग्रेस रिपोर्ट प्रसिद्ध केला. सहकारी बँकिंगमधील सर्व प्रकारच्या आर्थिक संस्थांची सांख्यकीय माहिती अहवालात दिली आहे. नागरी सहकारी बँकांनी प्रगतीत सातत्य राखले असून स्वमर्जीने केलेले विलिनीकरण, चांगल्या प्रतीचे वाढलेले कर्ज व्यवहार, नक्त अनुत्पादित कर्जांसाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदीत झालेली घट व व्याजाव्यतिरिक्तच्या उत्पन्नात झालेली वाढ यांमुळे नागरी सहकारी बँकांच्या नफ्यात वाढ झाली आहे. राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, संस्थांच्या नफ्यात व कर्जाच्या प्रतवारीत सुधारणा झाली असल्याचे अहवालात म्हटले आहे.



उदय पेंडसे
९८६९०३४६६२

**※ बँकांची संख्या –**

मार्च, २०२५ अखेर देशामध्ये १४५७ नागरी सहकारी बँका असून त्यापैकी ४९ बँका शेड्यूल्ड सहकारी बँका आहेत, तर १४०८ बँका नॉन शेड्यूल्ड सहकारी बँका आहेत. देशभरात १०८६४८ संस्था ग्रामीण सहकारी अर्थकारणात कार्यरत असून, त्यात ३४ राज्य सहकारी बँका, ३५१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १०७६४१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था (PACs), १३ राज्यस्तरावरील कृषी व ग्रामीण विकास बँका व ६०९ प्राथमिक कृषी व ग्रामीण विकास सहकारी बँकांचा समावेश आहे. सहकारी क्षेत्रातील सर्व संस्थांच्या कर्ज व्यवहारांचे एकत्रित मूल्य २४.५० लाख कोटी आहे. त्यापैकी ७१.२% वाटा ग्रामीण भागातील कर्ज व्यवहारांचा आहे. यापैकी ६८.६% कर्ज राज्य सहकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून दिली गेली आहेत.

**※ नागरी सहकारी बँका –**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नागरी सहकारी बँकांचा ताळेबंद ४.४%नी वाढला. ठेवी ५.२%नी तर कर्ज व्यवहार ६.७% वाढला,.गेल्या ६ वर्षात झालेली ही सगळ्यात जास्त वाढ आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत, म्हणजेच सप्टेंबर, २०२५ अखेर ठेवींमध्ये ६.८% व कर्ज व्यवहारांमध्ये ६.४% वाढ झाली आहे, हे निश्चितच उल्लेखनीय आहे. व्यापारी, खासगी बँकांच्या तुलनेत ही वाढ कमी असली, तरी नागरी सहकारी बँकांच्या मर्यादा लक्षात घेता, ही आकडेवारी निश्चितच समाधानकारक आहे.

नागरी सहकारी बँकांमध्ये एकूण ५,८४,४१५/- कोटींच्या ठेवी असून, या बँकांनी एकूण ३,७०,२२५/- कोटींचे कर्ज व्यवहार केले आहेत. या बँकांकडे एकूण ७,३८,७२९/- कोटींच्या मालमत्ता आहेत. कर्जांचे, ठेवींशी प्रमाण ६३.३% आहे, ज्यात गतवर्षीच्या तुलनेत सुमारे १% ने वाढ झाली आहे. नागरी सहकारी बँका, कर्ज व्यवहारासाठी प्रामुख्याने ठेवींवरच अवलंबून आहेत. नागरी सहकारी बँकांनी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण फक्त ०.८% आहे. नागरी सहकारी बँका ठेवींद्वारे मिळालेली रक्कम, प्रामुख्याने कर्ज व्यवहारासाठीच वापरत असून, गुंतवणुकांमध्ये माफक वाढ होईल असे धोरण दिसून येत आहे. गेल्या दशकभरात नागरी सहकारी बँकांच्या एकूण गुंतवणूकांपैकी ८९% गुंतवणूका, आवश्यक असणाऱ्या वैधानिक तरलता प्रमाणात (SLR) केलेल्या आहेत. राज्य सरकारच्या रोख्यांमध्ये गुंतवणूका करण्याचा कल वाढत असून, त्याचे प्रमाण ३६.८% आहे.

४६.३% म्हणजेच २७३ बँकांनी ५०/- कोटींपेक्षा कमी रक्कमेची कर्जे दिली असून, एकूण कर्जव्यवहारांच्या ५३.९% कर्जे ५७ बँकांनी दिली आहेत. २३.९% नागरी सहकारी बँकांची मालमत्ता ५०/- कोटींपेक्षा कमी असून, १०००/- कोटींपेक्षा अधिक मालमत्ता असलेल्या बँकांचे प्रमाण ६५.५% आहे. ठेवींबाबतही असाच कल दिसत आहे. नागरी सहकारी बँकांकडील एकूण ठेवींपैकी ६२.५% ठेवी १०२ बँकांकडे आहेत.

**※ नफाक्षमता –**

नागरी सहकारी बँकांच्या कर पश्चात नफ्यात या आर्थिक वर्षात १४.२% नी वाढ झाली आहे. संभाव्य नुकसानीसाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदीत झालेली घट, आयकरासाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदीतही झालेली घट ही नफा वाढीची प्रमुख कारणे आहेत.कर्ज व्यवहारातून मिळणाऱ्या व्याजात फक्त ५.३% नी वाढ होत असताना, ठेवींवर दिलेल्या व्याजात १०.३% वाढ झाली आहे. कर्ज व्याजाव्यतिरिक्त झालेल्या उत्पन्नात (non intrest income) झालेल्या ३३.१% च्या वाढीमुळे, नागरी सहकारी बँका नफा मिळवताना दिसतात. ठेवींवरील व्याजाच्या खर्चा व्यतिरिक्त (non interest expenditure) झालेल्या खर्चात ५.६% वाढ व त्यातही कर्मचाऱ्यांवर झालेला खर्च ९.६% ची वाढ दर्शवतो. त्यामुळे बँकांच्या दैनंदिन कामकाजातून मिळालेल्या नफ्यात (operating profit) केवळ १.९% वाढ झाली आहे. याबाबत नागरी सहकारी बँकांनी जागरूक होण्याची गरज आहे.

**※ भांडवल पर्याप्तता** (CRAR) –

भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांची चार स्तरांमध्ये (TIER I to IV) विभागणी केली आहे. यापैकी स्तर एकमधील बँकांची भांडवल पर्याप्तता किमान ९% व स्तर दोन ते चारमधील बँकांची भांडवल पर्याप्तता किमान १२% कायम असलीच पाहिजे, असा मापदंड निश्चित केला आहे. सर्व स्तरातील बँकांपैकी ९२.१% बँकांची भांडवल पर्याप्तता १२% पेक्षा अधिक असून, मार्च २०२५ अखेर ती १८% वर स्थिरावलेली आढळून येते. या १८% त ही नागरी सहकारी बँकांचे मूळ भाग-भांडवल ज्याला प्रथम स्तराचे भाग-भांडवल म्हणतात. (TIER 1 capital) ते १५% आहे, जे नागरी सहकारी बँकांची सक्षमता दर्शवतात.

**※ कर्जांची गुणवत्ता** (asset quality) -

बँकिंग क्षेत्रातील अनुत्पादित कर्जांचे प्रमाण, बँकांची नफा क्षमता व सक्षमता दर्शवते. नागरी सहकारी बँकांच्या कर्ज व्यवहारातील गुणवत्तेत सुधारणा होताना दिसत आहे. ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण (Gross NPA) ६.२% असून, गतवर्षीच्या तुलनेत ते सुमारे १% ने कमी झाले आहे. नक्त अनुत्पादित कर्जांचे प्रमाण (net NPA) केवळ शुन्य पूर्णांक सात टक्के असून, ते गेल्यावर्षी पेक्षा अर्धा टक्क्यांनी कमी झाले आहे. अनुत्पादित कर्जांसाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदींचे गुणोत्तरही (PCR. provisioning coverage ratio) ९०.१% आहे. या बाबी निश्चितच समाधान देणाऱ्या आहेत.

अग्रक्रम क्षेत्राला केला जाणाऱ्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण ६०% असावे असे निर्देश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत या आर्थिक वर्षात नागरी सहकारी बँकांनी अग्रक्रम क्षेत्राला ५५.५% कर्ज पुरवठा केला आहे. उल्लेखनीय म्हणजे यापैकी सूक्ष्म, लहान, मध्यम व मोठ्या (MSME) कर्जदारांना दिलेल्या कर्जांचे प्रमाण ३६.५% आहे. त्यातही सूक्ष्म कर्जदारांना कर्ज देण्यास नागरी सहकारी बँका अग्रेसर आहेत, त्यांनी यापैकी निम्म्यापेक्षा अधिक म्हणजेच १६.९% कर्जे या गटाला दिली आहेत. यातून

पुढील पानावर....




# भारतभूमी सर्वांसाठी साक्षात राष्ट्रपुरुष - अंबरीश पुंडलिक

## भाग्यश्री पतसंस्थेच्या पं. दीनदयाळ उपाध्याय स्मृती व्याख्यानमाला

**नवरगाव –** 'वंदे मातरम्'चा उद्‌घोष म्हणजेच सारे भारत मातेची आरती करीत असतो. वंदे मातरम् हेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांसाठी प्रेरणा ठरली आणि हा काळच सुयोग पर्व म्हणून उल्लेखनीय ठरला. भारत भूमीला पुरातन काळापासूनच 'आई' म्हणूनच आदर प्रकट करीत आलेलो आहे. ही भारत भूमी सर्वांसाठी साक्षात राष्ट्रपुरुष आहे, असे अकोला येथील वक्ते अंबरीश पुंडलिक यांनी सांगितले.

भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था नवरगाव येथील संस्थेच्या सावरकर सभागृहात आयोजित पं. दीनदयाल उपाध्याय स्मृती व्याख्यानमालेचे पहिले पुष्प वंदे मातरम्– राष्ट्रीय चेतनेचा महामंत्र या विषयावर गुंफले. संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, उपाध्यक्ष गोविंद बिसेन मंचावर होते.

दरवर्षी दिला जाणारा श्रीगुरुजी जीवनगौरव पुरस्कार यावर्षी वरोरा येथील अहिल्याबाई होळकर महिला व वृद्धाश्रमाच्या संस्थापिका सोनूताई अशोक येवले यांना प्रदान करण्यात आला. प्रकृती अस्वस्थ असल्याने सोनुताईंच्या अनुपस्थितीत हा पुरस्कार त्यांच्या सुकन्या यांनी स्वीकारला. अकरा हजार रुपये रोख रक्कम, शाल, श्रीफळ, रोपटे व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

'वसुधैव कुटुंबकम्'चा देव्हारा म्हणजे आपली भारत भूमी आहे. १९०५ ला वंदे मातरम् उद्‌घोष राष्ट्रीय चेतनेचा महामंत्र बनला. स्वातंत्र्याच्या उठावात मुलाला हौतात्म्य आल्यानंतर त्यांच्या आईने टाहो फोडला. तोही वंदेमातरम्च्या उद्घोषणानेच. स्वदेशीचा जागरही प्रभावी ठरला. व्यावसायिक व मजुरांनी विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकला. अगदी विद्यार्थ्यांनीसुद्धा विदेशी कागदावर परीक्षा देणे टाळले. बंगालची फाळणी निरस्त करण्यात यशस्वी झालो असलो तरी बंगालची आजची अवस्था भयावह आहे. त्यासाठी वंदेमातरम् रचनेच्या १५० वर्षी जागरूकता निर्माण करणे, हाच भारत मातेच्या चरणी समर्पित अर्चनेचा प्रसाद ठरेल, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, वैयक्तिक गीत संचालिका राधिका जाणी, संचालक विष्णु बोरकर यांनी सूत्रसंचालन तर आभार संचालक संदिप कामडी यांनी मानले.

---

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

व्यापारी मित्र अमृतपर्व 25 K वर्गणीदार

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

मागील पानावरून...

**नागरी सहकारी बँकांची सन २०२४-२५ मधील वाटचाल**

समाजातील छोट्या कर्जदारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्याचे काम या बँका करत आहेत, असे म्हणायला हरकत नाही. अग्रक्रम क्षेत्रातील कमकुवत गटाला (weaker section) ११.५०% कर्ज पुरवठा करणे आवश्यक असते.त्या निर्देशांनुसार नागरी सहकारी बँकांनी ११.९०% कर्ज पुरवठा केला आहे.

* **विलीनीकरण –** या आर्थिक वर्षात अडचणीत असलेल्या ७ सहकारी बँकांचे विलीनीकरण, मजबूत सक्षम असलेल्या मोठ्या सहकारी बँकांमध्ये करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील ६ बँकांचा व तेलांगणातील एका बँकेचा समावेश आहे. सहकारांतर्गत सहकार्य करून सहकारी बँकींग क्षेत्र मजबूत असल्याचा संदेश यामधून दिसून येतो.विलीनीकरण होऊ न शकल्यामुळे. ८ सहकारी बँकांचे परवाने रद्द करावे लागले. मात्र ठेव विमा महामंडळाकडून, या बँकांतील ठेवीदारांचे ४७६/– कोटींचे दावे मंजूर करण्यात आल्याने, ५ लाखांपर्यंतच्या ठेवी असलेल्या ठेवीदारांना माफक दिलासा मिळाला.

* **सारांश –** खाजगी, सरकारी, व्यापारी बँकांकडे असलेले मनुष्यबळ, तंत्रज्ञान, विस्तार, भांडवलाचे पाठबळ, सुरक्षितता या सगळ्याच बाबतीत नागरी सहकारी बँकांकडे असलेली मर्यादित उपलब्धता, याचा विचार करता नागरी सहकारी बँकांची प्रगती निश्चितच समाधानकारक म्हटली पाहिजे. परंतु मोठ्या कर्जदारांकडे थकीत होणारी कर्जे, नियमित कर्जफेड व्हावी, या दृष्टीने नियंत्रण यंत्रणा, अवाजवी खर्चावरील नियंत्रण सक्षम आधुनिक तंत्रज्ञान, कर नियोजन, कुशल मनुष्यबळ अशा काही आव्हानांचा मुकाबला कसा करावा, याचा निश्चितच विचार करणे आवश्यक ठरेल.

**– उदय पेंडसे. मो.नं. – ९८६९० ३४६६२**

# सुवर्ण कर्ज



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

पूर्वीच्या काळी प्रवासाला जाताना अडीअडचणीला खर्चायला लागले तर सोन्याची अंगठी अथवा वळं बोटात अडकवून जायची प्रथा होती. काय सांगा कधीही पैसा उभा करता येईल, हे सोने विकून. हा विचार त्यामागे होता. सोन्याच्या वळ्याची जागा पुढे प्लास्टिक मनी म्हणून विविध कार्ड्स घेतली. प्रगत तंत्रज्ञान, टेक्नॉलॉजी बदल याने त्याची जागा मोबाईल इंटरनेट यांनी घेतली. पण अडीअडचणीला खर्चायला लागले तर सोनेच कामास येते, यामध्ये बदल झालेला नाही. ही प्रथा वेगळ्या पद्धतीने चालू आहे, चालू राहणार. सोन्याला मरण नाही, त्याचा आधार समाजातील सर्व स्तरांतील समाज घेत होता, आहे आणि भविष्यातदेखील असणार. अढळ स्थान आहे सोन्याचे.



सोने गहाण टाकून कर्ज घेऊन आपल्या विविध गरजा सहजगत्या भागवल्या जातात. ठराविक काही दागिने बँका वा बँकांव्यतिरिक्त आर्थिक व्यवहार करणाऱ्या कंपन्या (NBFC - Non Banking Financial Company) मोठ्या प्रमाणात करीत आहेत. घरीदारी, व्यवसायात एकूणात आयुष्यात कधीही पैशाची चणचण भासली, गरज वाटली की दागिने गहाण टाकून कर्जरूपाने पैसा उभा केला जातो. ते तसेच आहे. सुवर्ण कर्ज प्रक्रिया सर्वसामान्यांच्या परिचयाची आहेच, तरी अगदी थोडक्यात पाहू या.

सुवर्ण कर्ज प्रक्रिया कशी आहे, हे थोडक्यात जाणून घेतले पाहिजे. सोने माझ्याकडे असणे याला महत्त्व खूप आहे. प्रकार दागिने स्वरूपात अधिक असते. असो. अल्पकालावधी, संपूर्णतः सुरक्षित, पूर्णतः तारण पूरक कर्ज आहे. सोने शुद्धता किमान १८ कॅरेट, पूर्णतः हॉलमार्किंग केलेले दागिने वा नाणी, मालकी कर्जदाराची हे सिद्ध करणे. वजन, शुद्धता, बँक नियुक्त सराफाकडून तपासणी आणि त्या दिवसाच्या बाजारभावाप्रमाणे त्याचे मूल्यमापन ग्राह्य धरून नियमानुसार त्यांच्या काही टक्के कर्जरक्कम ठरवली जाते. मूल्यमापन रु. १००/– असेल तर साधारणपणे रु. ७५/– कर्ज (७५%) मंजूर केले जाते. क्रेडिट स्कोअरची गरज नाही, कारण पूर्णपणे सुरक्षित कर्ज. नियमानुसार कागदोपत्री पूर्तता – सही शिक्का आलेच. त्वरित मंजुरी व कर्जदाराचे खात्यात रक्कम जमा. दागिने बँकेच्या ताब्यात सेफ कस्टडीत जातात. ते सांभाळून सव्याज कर्जफेड केल्यावर कर्जदारास त्वरित जसे होते तसे देणे हे बंधनकारक असते. जबाबदारी सांभाळताना अधिक काळजी घेतली जाते. बँका–बँकांमध्ये योजनेत तफावत, फरक असू शकतो.

नुकतेच भारतीय रिझर्व्ह बँकेने सुवर्ण कर्जाच्या प्रक्रियेमध्ये काही सुधार तसेच भर घालून ग्राहकांच्या दृष्टीने अधिक चांगली नियमावली आखली. त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून होणार आहे. नोव्हेंबर, २०२५ मध्ये त्यांची आखणी जाहीर केली गेली.

अ) कर्ज घेणाऱ्या व्यक्तीस कर्ज देणाऱ्याकडून गहाण ठेवलेल्या तारणाचे सर्व बारकावे नमूद करून तपशीलवार माहिती सर्टिफिकेट स्वरूप देणे, बंधनकारक राहील. यामध्ये सोन्याच्या दागिन्यांचा प्रकार, अलंकारांचे केलेले मूल्यांकन वजन, वर्णन, त्यामध्ये जर काही हिरे खरे कोंदणात असतील, त्यांचा उल्लेख असणार आहे. याने अधिक पारदर्शकतेबरोबर सुविधा लक्षात घेतली आहे. कर्जफेड करून लगेचच ग्राहकास त्याचे तारण परत करता येते. मध्ये वेळ घालवू नये. तारण दागिने वा नाणी जे असेल ते त्वरित बँकेकडून आपल्या ताब्यात देणे/घेणे ही दोघांची जबाबदारी असते. तेव्हा जे दिले होते तेच परत आले की नाही याची तपासणी करणे सहज सोपे जाणार आहे. खात्री करून घेणे महत्त्वाचे असते. यावर बँक व कर्जदार यांच्या सह्या, आवश्यक कागदपत्रांवर शिक्के घेणे सक्तीचे, महत्त्वाचे आहे.

ब) सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कर्ज रकमेत केलेली वाढ होय. सुवर्ण कर्ज रक्कम ठरविताना कर्ज मूल्यांकन रक्कम काढावी लागते. त्यास डढत – डेरप ढे तरश्रीश गुणोत्तर संबोधिले जाते. या गुणोत्तराचे प्रमाण बदलण्यात आले. सर्वसाधारणपणे ते ७०/७५ % होते. हीच टक्केवारी ७५ ते ८५ अशी वाढविण्यात आलेली आहे. सोन्याच्या दागिन्याचे मूल्यांकन जर रु. १००/– असेल तर कर्जरक्कम रु. ८५/– अधिकाधिक देण्यात येईल.

क) शेतीसह अन्य व्यवसाय, स्टार्टअप, एमएसएमई व्यावसायिक यांना अधिकाधिक २ लाख कर्ज देता येईल इतक्या सुवर्ण दागिन्यांवर कर्ज घेता येते. जेणेकरून देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळून बळकटी येईल.

ड) नवीन नियमावलीत एका कर्जदारास एकाच कर्जदात्याकडून किती सोने गहाण टाकून कर्ज घ्यायचे, यावर बंधन घातलेले आहे. म्हणजे एक माणूस एका बँकेकडून कर्ज घेताना अधिकाधिक १ किलाग्रॅम सोन्याचे दागिने गहाण ठेवू शकतो.

तसेच सोन्याच्या नाण्यांचे वजन हे ५० ग्रॅमपेक्षा अधिक नसावे. नाणीदेखील फक्त बँकांकडून घेतलेली नाणी कर्ज मंजुरी साठी चालतात. अन्य नाण्यांवर कर्ज मिळत नाही. सोन्याचे कर्ज हे मर्यादित प्रमाणात असावे, यासाठी हे बंधन घातलेले दिसते.

– **वंदना धर्माधिकारी,** Vandana10dyahoo.co.in
**मो.नं.** - 9890623915 *****


**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**
स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

| * बँकेच्या विविध कर्ज योजना * | * बँकेच्या अत्याधुनिक सुविधा * |
|---|---|
| • शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज | • एनी ब्रँच बँकींग |
| • वाहन कर्ज | • आरटीजीएस |
| • सोनेतारण कर्ज | • एनईएफटी |
| • शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०% | • मोबाईल बँकींग |
| • व्यावसायिक कॅश क्रेडिट | • यूपीआय सुविधा |
| • ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज | • ई-कॉमर्स |
| • औद्योगिक कर्ज | • लॉकर सुविधा उपलब्ध |
| • गृह कर्ज | |

* किफायतशीर व्याजदर * जलद कर्ज पुरवठा * सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती**
**३१/०३/२०२५ अखेर**
• ठेवी – १४७६६.८४ कोटी
• कर्जे – १२०५९.०३ कोटी
• एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून
ठेवीवरील व्याजदरात वाढ
२ वर्षांकरिता ७.००%
(ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

* विद्यमान संचालक मंडळ *
मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

वारसा विश्वासाचा

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | फोन : 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# स्वतःचं घर – आता स्वप्न नव्हे, वास्तव

# दत्तोपंत ठेंगडी

## गृह कर्ज योजना



**8.25%***

**व्याजदर**

*नियम व अटी लागू

**डॉ. नितीन खर्चे**
अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला**
उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

- संचालक -

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने**
**आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला **QR** कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
  शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

NUCC®

NIRMAL UJJWAL CREDIT CO-OP. SO. LTD., NAGPUR (MULTI-STATE)

रुपया 1 RUPEE 1989

NUCC ESTD. 1989

निर्मल उज्वल™

क्रेडिट को-ऑप. सोसा. लि. नागपूर (मल्टीस्टेट)



Welcome 2026 HAPPY NEW YEAR

## सुलभ कर्ज योजना

- सुवर्ण तारण कर्ज
- गृह तारण कर्ज
- वाहन कर्ज ( 2 व्हीलर / 4 व्हीलर)
- तारण कर्ज
- प्रोजेक्ट कर्ज
- सोलार कर्ज
- वैयक्तिक कर्ज

### ठेवी

- 46 ते 180 दिवसा करीता 6%
- 181 ते 364 दिवसा करीता 7%
- 24 महीने 9.5% | 10% (जेष्ठ नागरिक)
- 12 महीने ते 36 महीने 8% | 8.5% (जेष्ठ नागरिक)
- 36 महीने व अधिक 8.25% | 8.75% (जेष्ठ नागरिक)
- 13 महीने 9% | 9.5% (जेष्ठ नागरिक)
- 84 महिन्यात दाम दुप्पट

### विशेष ठेवी स्कीम

- 151 दिवसा करीता 8.5%
- 181 ते 364 दिवसा करीता 9%

- ☑ कमी व्याजदर
- ☑ सोपी कागदपत्रे
- ☑ जलद प्रक्रिया
- ☑ विश्वासार्ह सेवा

इन्शुरन्स सुविधा उपलब्ध : जीवन विमा | सामान्य विमा | आरोग्य विमा

**नवीन वर्ष तुमच्या आयुष्यात आनंद, समृद्धी आणि सुख घेऊन येवो!**


आजच संपर्क करा अधिक माहितीसाठी भेट द्या

(अटी व शर्ती लागू )*.

Add:193, Nandanvan Main Road, Nagpur - 09 | Ph No. 0712-2740800

Email : nirmalujjwal@gmail.com | Website : www.nirmalujjwal.com


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.net
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.


प्रधानमंत्री आवास योजना
(शहरी २.०) अंतर्गत सबसीडीस पात्र
आपले गृहकर्ज साकार करणं
आता होईल सोपं!
गृहकर्ज
व्याजदर
7.75%*
(पासून पुढे)
सिबील आधारित व्याजदर
कॉम्बो ऑफर
(भारत सरकार सबसीडीस पात्र)
पीएम सूर्यघर मोफत
वीज योजना अंतर्गत
गृहकर्ज घेतलेस
रुफटॉप सोलर
पॅनल कर्ज
व्याजदर सुध्दा
7.75%*
(पासून पुढे)
* नियम व अटी लागू
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
मोबाईल : ७८८८००९७१८
Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८


सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित
सहकार भारती
नागरी सहकारी 2026
बँक / पतसंस्था दैनंदिनी
नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश
देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...
नागरी सहकारी बँक दैनंदिनी 2026
नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६
किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६
नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी 2026
सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor


**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,**
**Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,**
**Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**


तीन दशके विश्वासाची, ३० वर्षे 'लोकमान्य'ची!
1995-2025
आनंदोत्सव तीन दशकांचा..,
गुंतवणूकीच्या सुवर्णसंधीचा...सादर आहे
आनंदोत्सव
निवेश योजना
आकर्षक १०.५०% व्याजदर
★★★
कालावधी:
30 महिने
किमान गुंतवणूक:
₹ 10,000/-
* नियम व अटी लागू. योजना फक्त सभासदांसाठी
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/01/2026) Posting on 07/01/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

